

संस्कृत श्लोक
समाधानाय सौख्याय निरोगत्वाय जीवने |
योगमेवाभ्यसेत् प्राज्ञो यथाशक्ती  निरन्तरम् ||

या श्लोकाचा अर्थ वाचा पान ४ वर

PTVA Schools

# दर्पण

For private circulation only



**देवशयनी आषाढी एकादशी**
आषाढ महिन्यातील शुक्ल पक्षात येणाऱ्या एकादशीला 'देवशयनी आषाढी एकादशी' असे म्हणतात. आषाढी एकादशी किंवा देवशयनी एकादशी, ही हिंदू पंचांगातील एक तिथी आहे. हा वारकरी सांप्रदायाचा सर्वात मोठा उत्सव आहे. आषाढी एकादशीच्या दिवशी लाखोंच्या संख्येने वारकरी, भक्त पंढरपूरमध्ये विठ्ठलाच्या दर्शनासाठी दाखल होतात.

VOLUME: 04 | ISSUE : 05 | 12 PAGES    June 2026

## Editorial

## Embracing Evolution for a Brighter Future

**Dear Students ,Teachers, and Parents,**

It gives us immense pleasure to connect with you through this edition of Darpan. This academic year marks a historic milestone in the journey of the Parle Tilak Vidyalaya Association as we announce the mutual relocation of our PTV ICSE School and our Parle Tilak Vidyalaya Marathi Medium School.

Change is the law of life, and adapting to it is the need of the hour. In modern education, infrastructure must dynamically align with the evolving numbers and spatial requirements of our students. To ensure optimal resource utilization and provide a more conducive learning environment for both sections, this strategic swap of buildings became essential. It is a decision made with a singular vision: the holistic growth of every PTVA student.



An institutional shift of this magnitude is never easy, but our PTVA Pariwar rose to the occasion. We extend our profound gratitude to our dedicated principals, teachers, and administrative staff, who worked tirelessly behind the scenes. Your meticulous planning ensured that the transition was seamless, keeping the academic calendar entirely undisturbed. Equally, we are incredibly thankful to our parents. Your unwavering trust in PTVA's management, your patience, and your constructive cooperation during this shifting process have been our greatest strength.

Guided by our sacred motto, 'न हि ज्ञानेन सदृशं पवित्रमिह विद्यते' (Truly, there is nothing as sacrosanct as knowledge in this world), we look at these new spaces as renewed horizons for young dreams to flourish. Together, let us step into this vibrant new chapter with shared enthusiasm. Best wishes for a successful academic year ahead.

**- Shri.  Anil Ganu, President, PTVA**
As told to Mrs. Janhavi Khandekar
Chief Academic & Admin Officer,
PTVA & Editor, Darpan



PTV (ICSE) New Building



पार्ले टिळक विद्यालय मराठी माध्यम (नवी इमारत)

# पार्ले टिळक विद्यालय मराठी माध्यमाच्या शाळांचे नूतन इमारतीत स्थलांतर

पार्ले टिळक विद्यालय मराठी माध्यमाच्या प्राथमिक आणि माध्यमिक विभागाचे शाळेच्या १०६ व्या वर्धापनदिनाचे औचित्य साधत नूतन इमारतीत स्थलांतर करण्यात आले. शाळेच्या पहिल्याच दिवशी स्वच्छ व नीटनेटका गणवेश परिधान करून, आनंदी चेहऱ्याने आलेले विद्यार्थी या आगळ्यावेगळ्या स्वागताने भारावून गेले.

नवीन इमारतीत प्रवेश करण्याची उत्सुकता विद्यार्थ्यांच्या चेहेऱ्यावर स्पष्टपणे दिसून येत होती. विद्यार्थ्यांचे स्वागत करून त्यांच्या नव्या शैक्षणिक प्रवासाची आनंददायी सुरुवात करण्यात आली.

यानंतर अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने विद्यार्थ्यांनी नव्या वर्गखोल्यांमध्ये प्रवेश केला. नव्या इमारतीतून शिक्षणाचा प्रारंभ होत असल्याने विद्यार्थी, शिक्षक आणि पालकांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून, ही नवी वास्तू विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी प्रेरणादायी ठरेल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

## A New Chapter Begins At PTV (ICSE)!



PTV ICSE (Primary)

The inaugural ceremony marking the relocation to the new school building of PTV (ICSE) was held with great enthusiasm and solemn dignity.

At PTV ICSE (Secondary), the ceremony commenced with the garlanding of the statue of Lokmanya Tilak by the principal Dr (Mrs) Arnavaz Bhagat, as a mark of deep respect and reverence for the eminent leader. This was followed by the lighting of the ceremonial lamp.

• Pg. 11






## टर्फ विकेट्सचे उद्घाटन

पार्ले टिळक विद्यालय असोसिएशन संचालित PTVA Sports Academy च्या मैदानात ५ टर्फ विकेट्सची उभारणी करण्यात आली आहे. पावसाळ्यातही विद्यार्थ्यांच्या क्रिकेट सरावात खंड पडू नये यासाठी ही विशेष सुविधा संस्थेमार्फत तयार करण्यात आली आहे. मुंबई क्रिकेट असोसिएशनचे कार्यवाह डॉ. उन्मेष खानविलकर यांच्या हस्ते रविवार १४ जून २०२६ रोजी फीत कापून आणि विकेट्सची पूजा करून या पाचही टर्फ विकेट्सचे उद्घाटन करण्यात आले. या टर्फ विकेट्स निर्मितीची संकल्पना बन्सीधर धुरंधर यांची असून उभारणीमध्ये त्यांचा प्रत्यक्ष मोलाचा सहभाग आहे. यावेळी संस्थेचे अध्यक्ष अनिल गानू, खजिनदार बन्सीधर धुरंधर, सभासद धनंजय साठ्ये, मुख्य शैक्षणिक अधिकारी जान्हवी खांडेकर, पाटिविअ स्पोर्ट्स अकॅडमीचे प्रमुख प्रशिक्षक सुरेन आयरे तसेच सर्व शाळा व महाविद्यालयातील क्रीडा शिक्षक, विद्यार्थी, क्रिकेट संघ उपस्थित होते.



PTVA's EMS, Andheri


PTVEMS (Primary)

# All's well, that BEGINS well...

PTVEMS (Primary) and PTVA's EMS, Andheri welcomed their students with open arms as the schools resumed operations for the new academic year.

PTVEMS (Primary) campus came alive with joy, laughter, and vibrant energy as it celebrated "Shala Pravesh Divas" welcoming its students back for a brand-new academic year. The entire school wore a festive look, beautifully adorned with bright pink and blue balloons that caught the warm afternoon sun. Inside the corridors, each classroom was lovingly decorated by the class teachers, creating a warm and inviting atmosphere. The display boards blossomed with creativity, featuring stunning welcome drawings meticulously crafted by drawing teacher, Ms Shilpa. The highlight of the morning was the heartfelt welcome given to the young learners. The class teachers of Std. 1 greeted each student with a traditional *Marathmoli* touch—applying a sacred 'tilak' and 'akshata' to wish them a blessed and successful journey ahead. To add sweetness to the new beginnings, every student from Std. 1 to 4 was surprised with a Munch chocolate as a welcome gift. After the joyful greetings, students settled into their freshly decorated classrooms. Teachers took the attendance and shared essential general instructions, setting a positive and disciplined tone for the year.

Similarly, school reopening day at PTVA's EMS, Andheri, was filled with excitement as students, staff, and parents gathered on 15 June. The day marked the beginning of a fresh journey filled with new adventures, friendships, and challenges. The school premises were beautifully decorated with colourful balloons to welcome everyone back. Inspiring banners and posters displayed captions like, "Dream Big, Work Hard and Shine Bright" and "Education is a gift that no one can take away." During her address, the Principal welcomed the students and staff, sharing this year's inspiring theme: "Learn with Curiosity, Grow with Kindness." Teachers hosted fun games, and sweets were distributed to celebrate the occasion. A major highlight of the day was the dedicated selfie point, where enthusiastic learners posed to celebrate their readiness for the new academic year.

**Clue 1 : It is the foundation that shapes our future and helps us become responsible citizens.**


पार्ले टिळक विद्यालय मराठी माध्यमिक

## प्रवेशोत्सवाने उजळला शाळेचा पहिला दिवस

यंदा १५ जून २०२६ रोजी पार्ले टिळक विद्यालय असोसिएशनच्या शाळांमध्ये नवीन शैक्षणिक वर्षाचा प्रारंभ अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात प्रवेशोत्सव साजरा करून करण्यात आला.

परांजपे विद्यालयात नव्या उमेद, आनंद आणि उत्साहाने शाळेत दाखल होणाऱ्या विद्यार्थ्यांचे शाळेच्या प्रवेशद्वारी मुख्याध्यापक श्री. हाक्के सर, पर्यवेक्षिका सौ. लाड तसेच सर्व शिक्षकवृंद यांनी आपुलकीने व कौतुकाने स्वागत केले.

विद्यार्थ्यांचे स्वागत करताना त्यांना पेन भेट देण्यात आले. या भेटीमुळे विद्यार्थ्यांच्या चेहेऱ्यावर आनंद आणि उत्साह दिसत होता. प्रवेशोत्सवानिमित्त शाळेचे प्रवेशद्वार आकर्षक फुग्यांनी सजवण्यात आले होते. तसेच सुंदर रांगोळी, रंगीबेरंगी चित्रे आणि मनमोहक सजावटीमुळे संपूर्ण शालेय परिसर उत्सवमय वातावरणाने नटला होता.

या स्वागत समारंभामुळे विद्यार्थ्यांमध्ये शाळेविषयी आत्मीयता, उत्सुकता आणि आनंदाची भावना निर्माण झाली. नवीन शैक्षणिक वर्षाची सुरुवात अशा आनंददायी वातावरणात झाल्याने विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रवासाला प्रेरणादायी दिशा मिळाली.

तर पार्ले टिळक विद्यालय मराठी माध्यमाच्या माध्यमिक विभागात पाचवी ते नववीच्या विद्यार्थ्यांचा स्वागतोत्सव उत्साहात साजरा झाला. नवीन इमारतीमध्ये प्रवेश करण्याची उत्सुकता सर्व विद्यार्थ्यांच्या चेहेऱ्यावर दिसत होती. चॉकलेट व पेन देऊन सर्व विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले. शाळेत प्रवेश करणाऱ्या विद्यार्थ्यांवर पुष्पवृष्टीही करण्यात आली. शाळेच्या पहिल्या दिवशी स्वच्छ नीटनेटका गणवेश घालून, आनंदी चेहेऱ्याने येणारे विद्यार्थी या स्वागताने भारावून गेल्याचे आणि आनंदीत झाल्याचे दिसत होते. वर्षभर छान काम करून शाळेचे नाव उज्वल करण्याची प्रतिज्ञा विद्यार्थ्यांनी यावेळी घेतली. अत्यंत शिस्तीत नवीन वर्ग खोल्यांमध्ये विद्यार्थ्यांनी प्रवेश केला. प्रार्थना झाल्यावर शाळेच्या १०६ व्या वर्धापनदिनाबद्दलची माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली.


परांजपे विद्यालय माध्यमिक




## Roots, Ragas, and Asanas: A Triple Celebration at PTVA's EMS, Andheri

PTVA's EMS, Andheri celebrated its 10th Foundation Day on 21 June with immense enthusiasm. The milestone event was doubly significant as it coincided with World Music Day and the International Day of Yoga. This triple celebration beautifully highlighted the school's deep-rooted commitment to holistic education, culture, and wellness.

The festivities commenced with a traditional lamp-lighting ceremony, followed by Ganesh Pujan and Saraswati Pujan. In a tribute to heritage, board members of the PTV Association—Treasurer Shri Bansi Dhurandhar, Director Shri Pramod Lele, and Chief Academic and Administrative Officer Mrs Janhavi Khandekar—garlanded the statuette of Lokmanya Tilak.

The formal proceedings began with the State Anthem, followed by a melodious welcome song performed by the school choir. Welcoming the gathering, the Principal highlighted key milestones from the school's journey and expressed deep gratitude to the PTVA for their vision and unwavering leadership. A respectful tribute was paid to the late Director, Dr Snehlata Deshmukh, whose foundational vision shaped the institution. Addressing the gathering, Director Shri Pramod Lele motivated the students, reminding them of the upcoming academic year 2026–27 when the school's first-ever batch will appear for the SSC Board examinations. He urged them to dedicate themselves entirely to their preparation, assuring them that success would follow.


The event also served as a platform to honour excellence, as merit-holding students from various state- and district-level competitions were felicitated by the Chief Guests.

**The cultural and wellness segments captivated the audience:**

- **Yoga Display:** Marking the International Day of Yoga, students performed a beautifully synchronised routine showcasing exceptional flexibility, focus, and discipline.
- **Nukkad Natak:** A powerful street play directed by Assistant Teacher Mrs Aarti Kalekar conveyed a vital message about energy resource conservation, earning widespread applause.
- **Musical Rendition:** In celebration of World Music Day, students delivered a mesmerising Sanskrit performance marked by flawless diction and deep devotion. The performance was mentored by Music Teacher Mrs Kaavya Rane.

The grand event concluded on a high note, leaving the students inspired and the institution poised for its next chapter of academic excellence.

**- Mrs Aarti Kalekar,**
**Asst Teacher, PTVA's EMS, Andheri**






# Library Activities Foster Creativity and Reading Skills

As part of its ongoing efforts to nurture a love for reading and learning, the Library Department of PTV (ICSE) conducted a series of engaging activities for students of Grades III to V.

Grade III students participated in Word Garden, where they explored new vocabulary from storybooks and creatively displayed words and meanings in the form of colourful leaves and flowers. The activity enriched their vocabulary and strengthened comprehension skills.

Grade IV students showcased their imagination through Hanging Story Mobiles, illustrating memorable scenes from stories and presenting them through artistic displays. This activity encouraged visualisation, interpretation, and creative expression.

Grade V students enthusiastically created a Comic Strip Gallery, designing comic strips based on stories and original ideas. Through sequential art, dialogues, and characters, they demonstrated storytelling skills and creativity.

The initiative reinforced the library's role as a vibrant learning space that nurtures curiosity, creativity and a lifelong love for reading.




# Nurturing Leadership and Responsibility

The Investiture Ceremony of PTV (ICSE) was conducted on 15 June with great dignity and enthusiasm, marking the formal induction of the newly elected student leaders for the academic year 2026–27. The ceremony commenced with a warm welcome, followed by the school prayer, creating an atmosphere of solemnity and reverence.

A graceful Ganesh Vandana dance invocation marked the auspicious beginning of the proceedings. The audience was then treated to an impressive march-past by the school band, followed by the flag bearers of the Primary and Secondary Sections. The outgoing and incoming office bearers participated in the ceremonial march, symbolizing the transition of leadership.

The newly elected prefects were formally invested with their sashes by the Board of Directors, Shri Vinay Jog (Vice President of PTVA) and Mrs Janhavi Khandekar (Chief Academic and Administrative Officer) and the school flags were ceremonially handed over to the incoming leaders. This was followed by the oath-taking ceremony, where the student council pledged to uphold the values and responsibilities entrusted to them.

The Principal, Dr (Mrs) Arnavaz Bhagat addressed the gathering, congratulating the newly elected leaders and encouraging them to lead with integrity, commitment, and dedication. The ceremony concluded with a heartfelt vote of thanks, marking the beginning of a promising leadership journey for the student council of the academic year 2026–27.

# Mrs Yamini Dalvi and Mrs Kalpana Ved sign off


Mrs Yamini Dalvi

**Scan the QR codes to watch the special tribute videos prepared by the school staff as a heartfelt token of love, gratitude and respect for its beloved mentors.**


Mrs Kalpana Ved

PTVEMS (Secondary) extended a heartfelt farewell to its Deputy Headmistress and Art teacher, Mrs Yamini Dalvi, and English and Geography teacher, Mrs Kalpana Ved. Mrs Dalvi completed 33 years, while Mrs Ved completed 20 years of dedicated service to the institution.

Throughout their illustrious careers, they touched countless lives through their commitment, compassion and unwavering dedication to education. Mrs Dalvi's inspiring leadership, artistic vision and steadfast support to students and staff have greatly enriched the school community. Mrs Ved's passion for teaching, subject expertise and sincere concern for her students have left a lasting impression on generations of learners.

As they begin a new phase of life, the entire PTV family expresses its gratitude for their invaluable service and wishes them good health, happiness and fulfilment in all their future endeavours.

**Clue 2 :**
**A lifelong process allows us to gain new skills and understand the world around us.**

# Celebrating 19 Glorious Years at PTV (ICSE)



PTV ICSE (Primary)


PTV ICSE (Secondary)

The 19th Foundation Day of PTV (ICSE) was celebrated with great enthusiasm and reverence in the school auditorium. The event marked another milestone in the institution's journey of academic excellence, holistic development, and value-based education.

The programme of the Secondary Section commenced with the Principal, Dr (Mrs) Arnavaz Bhagat, garlanding the statues of Lord Ganesha and Goddess Saraswati, seeking their blessings for wisdom, knowledge, and success. This was followed by a solemn prayer that created a serene and auspicious atmosphere. The Principal then addressed the gathering. She welcomed the students to the new building and highlighted the school's achievements over the years and encouraged students to uphold the values and traditions of the institution. The Vice Principal also shared inspiring words, emphasising on the importance of dedication, and perseverance in achieving success. Students presented a beautiful prayer dance that captivated the audience with its elegance and spiritual essence. This was followed by a heartfelt Hindi poem recitation that beautifully expressed gratitude towards the founders and the institution. A special highlight of the programme was a Marathi play performed by the students. The play entertained the audience and highlighted the values instilled by the school over the years. The celebration concluded with a vote of thanks, leaving everyone with a renewed sense of pride and belonging to the PTV family.

Similarly, the programme at Primary Section of PTV (ICSE) began with a graceful prayer dance, followed by an address by Principal, who welcomed the students to the new school building and encouraged them to uphold the values that define the school's culture and traditions. The Headmistress also addressed the gathering, reflecting on the school's journey and commitment to excellence. A specially curated alumni message video highlighted the enduring bond between the institution and its former students. The celebration also featured a melodious song, an engaging skit titled "Subject Superheroes," and the felicitation of students whose artworks for the Sanskriti Art Exhibition contributed towards a noble cause. A vibrant finale dance added colour and energy to the occasion. The event concluded with a vote of thanks, leaving everyone inspired by the school's rich legacy, achievements, and dedication to holistic education.

# माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षेतील विद्यार्थ्यांचे यश

माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा २०२६ चा पार्ले टिळक विद्यालय असोसिएशनच्या शाळांचा निकाल यंदाही चांगला लागला आहे.

पार्ले टिळक विद्यालय मराठी माध्यमिक विभागाचा निकाल ९९.४१ टक्के लागला. शाळेतील १७० विद्यार्थी हे विद्यालयातर्फे परीक्षेला बसले होते, यातील १६९ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. ९० टक्क्यांपेक्षा जास्त गुण मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या आठ असून ८५ ते ९० टक्के गुण मिळवणाऱ्यांची संख्या १३ आहे. ८० ते ८५ टक्के गुण मिळवणाऱ्यांची संख्या २० असून ६० ते ८० टक्के गुण मिळवणाऱ्यांची संख्या ८२ इतकी आहे.

विद्यालयातून गार्गी शैलेश पाटील हिने ९६.४० टक्के एवढे गुण मिळवून विद्यालयात प्रथम क्रमांक पटकावला. शांत, सुस्वाभावी, अतिशय नम्र, प्रत्येकाला मदत करण्यासाठी तत्पर आणि अभ्यासात हुशार असलेली गार्गी प्रत्येक काम मन लावून करते. विविध आंतरशालेय स्पर्धांमध्ये शाळेला अनेक बक्षिसे तिने मिळवून दिली आहेत. तिच्या मेहनत करण्याच्या वृत्तीचे आणि समजूतदार स्वभावाचे सर्वांना खूपच कौतुक वाटते.

अथर्व सुधीर धासरे याने ९६ टक्के गुण मिळवून द्वितीय क्रमांक पटकावला. इयत्ता सातवी व दहावी मध्ये आदर्श विद्यार्थ्याचे पारितोषिक पटकावलेला, एनडीएमध्ये जाऊन देशसेवा करण्याची इच्छा असलेला, एनसीसीमध्ये उत्तम कामगिरी बजावणारा, उत्साही, आनंदी आणि सर्वांचाच लाडका असा अथर्व गुणी विद्यार्थी आहे.





आर्यन



पारस



अथर्व



साची



वैष्णवी

विद्यालयातून तिसरा क्रमांक पटकावणारी विद्यार्थिनी मधुरा उमाकांत देपोलकर हिने ९३.४० टक्के गुण मिळवले. शांत, सुस्वाभावी, विज्ञान विषयाची विशेष आवड असलेली, नवीन गोष्टी शिकण्यास सदैव तयार असणारी, मराठी भाषा आणि आपल्या संस्कृतीचा अभिमान असणारी समजूतदार, प्रामाणिक आणि मेहनती विद्यार्थिनी आहे.

नीतीशा विनायक मोहिते हिने ९२.४० टक्के गुण मिळवून विद्यालयात चौथा क्रमांक पटकावला. अतिशय बोलकी, उत्साही, स्पष्टवक्ती, शाळेतील विविध स्पर्धांमध्ये भाग घेणारी, खेळाची विशेष आवड असणारी, संस्कृत आणि गणित हे तिच्या आवडीचे विषय आहेत.

दिव्या संदीप पेरवे हिनेही ९२.४० टक्के गुण मिळवून विद्यालयातून चतुर्थ क्रमांक पटकावला आहे. अतिशय शांत, हळवी, मृदू स्वभावाची, कोणालाही न दुखावता सर्वांशी आपुलकीने वागणारी, तरीही स्वतःच्या मतांवर ठाम राहणारी, स्वतःचे विचार आत्मविश्वासाने मांडणारी, सुंदर हस्ताक्षर असणारी फलक लेखनाची आवड असणारी, विद्यालयातील रोटरी क्लबची प्रेसिडेंट अशी ही गुणी विद्यार्थिनी आहे.

देविका सूर्यकांत सावंत हिने ९२.२० टक्के गुण मिळवून विद्यालयातून पाचवा क्रमांक पटकावला. सर्व काम वेळेत आणि मेहनतीने पूर्ण करणारी, नवनवीन गोष्टी शिकण्यास नेहमीच तयार असणारी, शाळेच्या विविध उपक्रमांत सहभागी होणारी उत्साही अशी ही विद्यार्थिनी आहे.

तर परांजपे विद्यालय मराठी माध्यम माध्यमिक शाळेच्या शालांत प्रमाणपत्र परीक्षेचा निकाल ९५.१२ टक्के लागला. या विद्यालयातील पारस अमोल चव्हाण या विद्यार्थ्याने ८३ टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकावला. तर ८२.६० टक्के मिळवून आर्यन कैलास गायकवाड याने द्वितीय, ८०.६० टक्के मिळवून वैष्णवी महेश मांडवे हिने तृतीय, ७८.४० टक्के मिळवून अथर्व संजय धामणे याने आणि साची वैभव पाटील यांनी चौथा क्रमांक पटकावला.

## विद्यार्थ्यांच्या हाती ज्ञानाचा खजिना

परांजपे विद्यालयात नवीन शैक्षणिक वर्षाची सुरुवात उत्साहपूर्ण वातावरणात झाली. प्रवेशोत्सवाच्या आनंददायी वातावरणात विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले. याच दिवशी शासनाच्या मोफत पाठ्यपुस्तके वाटप योजनेअंतर्गत विद्यार्थ्यांना नव्या शैक्षणिक वर्षासाठी पाठ्यपुस्तकांचे वितरण करण्यात आले.



शाळेच्या पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांच्या हातात नव्या कोऱ्या पुस्तकांचा संच पडताच त्यांच्या चेहऱ्यावरील आनंद ओसंडून वाहत होता. नवीन पुस्तकांची पाने चाळताना विद्यार्थ्यांमध्ये नव्या ज्ञानप्रवासाबद्दल उत्सुकता आणि कुतूहल दिसून येत होते. शिक्षणाच्या वाटचालीसाठी आवश्यक असलेली ही पाठ्यपुस्तके वेळेत उपलब्ध झाल्यामुळे विद्यार्थी आणि पालक दोघांनाही समाधान वाटले.

मुख्याध्यापक श्री. हाक्के, पर्यवेक्षिका सौ. लाड तसेच शिक्षकवृंद यांच्या उपस्थितीत हा उपक्रम पार पडला. विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी आवश्यक शैक्षणिक साधने उपलब्ध करून देण्याच्या शासनाच्या प्रयत्नांचे सर्वांनी स्वागत केले.

प्रवेशोत्सवाचा उत्साह आणि मोफत पाठ्यपुस्तकांचे वाटप यामुळे परांजपे विद्यालयातील नवीन शैक्षणिक वर्षाची सुरुवात विद्यार्थ्यांसाठी संस्मरणीय ठरली. "हातात नवी पुस्तके आणि मनात नवी स्वप्ने" या भावनेने विद्यार्थ्यांनी नव्या शैक्षणिक वर्षाचे आनंदाने स्वागत केले.

## प्रेरणादायी शिक्षक तुकाराम पाटील सेवानिवृत्त

परांजपे विद्यालयातील कर्तव्यनिष्ठ, विद्यार्थीप्रिय आणि बहुआयामी व्यक्तिमत्त्व असलेले तुकाराम कृष्णा पाटील ३१ मे २०२६ रोजी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले.

श्री. पाटील यांनी १ ऑगस्ट १९९८ रोजी K.G.T. हायस्कूल, प्रभादेवी येथे शिक्षक म्हणून आपल्या सेवेला प्रारंभ केला. त्यानंतर १ जानेवारी २००८ रोजी ते परांजपे विद्यालयात रुजू झाले आणि तब्बल अठरा वर्षे निष्ठेने अध्यापन कार्य पार पाडत ते यावर्षी सेवानिवृत्त झाले आहेत.

कुनरी (ता. गडहिंग्लज) या गावातील श्री. पाटील यांनी कमलेश्वर विद्यालय, सांबरे येथून माध्यमिक शिक्षण पूर्ण करून शिवाजी विद्यापीठातून उच्च शिक्षण संपादन केले. रवळनाथ माध्यमिक विद्यालयाच्या निर्मितीत तसेच गावातील लिंगेश्वर देवस्थान मंदिराच्या उभारणीत त्यांचा सक्रिय सहभाग राहिला. शिक्षण क्षेत्रासोबतच ते 'पाटील ॲग्रो फुड्स' हा व्यवसायही यशस्वीपणे सांभाळत आहेत.



खणखणीत आवाज, नेतृत्वगुण, समाजाभिमुख वृत्ती आणि विद्यार्थ्यांप्रती असलेले अपार प्रेम यामुळे ते सर्वांचे लाडके शिक्षक ठरले. वृक्षलागवड व संवर्धन, गरजू विद्यार्थ्यांना मदतीचा हात देणे हे त्यांचे आवडते छंद आहेत. शिवजयंतीच्या कार्यक्रमात त्यांच्या दमदार आवाजातील पोवाडा विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रप्रेम व प्रेरणा जागृत करीत असे. कार्यक्रमानंतर स्वतःच्या खर्चाने विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करून ते विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद फुलवत असत.

ज्ञानदान, समाजसेवा, पर्यावरणप्रेम आणि विद्यार्थ्यांविषयीची आत्मीयता या गुणांनी समृद्ध असलेले तुकाराम पाटील हे परांजपे विद्यालयाच्या इतिहासातील एक प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व म्हणून सदैव स्मरणात राहतील. परांजपे विद्यालय परिवाराच्या वतीने श्री. पाटील सरांना त्यांच्या निवृत्तीनंतरच्या आयुष्यासाठी उत्तम आरोग्य, आनंद, समाधान आणि दीर्घायुष्याच्या मनःपूर्वक शुभेच्छा!

### सेवा संपली, नाते नाही

## मुख्याध्यापिका मुक्ता मिठे यांची सेवानिवृत्ती



जीवनात काही व्यक्ती आपल्या कर्तृत्वाने, प्रामाणिकपणाने आणि प्रेमळ स्वभावाने अनेकांच्या मनावर कायमचा ठसा उमटवून जातात. अशाच व्यक्तिमत्त्वांपैकी एक म्हणजे पार्ले टिळक विद्यालय मराठी माध्यमिक शाळेच्या मुख्याध्यापिका मुक्ता उमेश मिठे. तब्बल ३५ वर्षे १० महिन्यांच्या प्रदीर्घ सेवेनंतर ३० एप्रिल २०२६ रोजी त्या सेवानिवृत्त झाल्या.

बी.एस्सी., बी.एड. शैक्षणिक पात्रता प्राप्त करून त्यांनी १३ जून १९९० रोजी शिक्षक म्हणून पार्ले टिळक विद्यालय मराठी माध्यमिक शाळेच्या प्रांगणात पहिले पाऊल टाकले. ज्ञानदानाचे पवित्र कार्य करताना त्यांनी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला सदैव प्राधान्य दिले. शिस्त, वेळेचे नियोजन, कर्तव्यनिष्ठा आणि विद्यार्थ्यांप्रती असलेली आत्मीयता या गुणांमुळे त्यांनी विद्यार्थी, पालक आणि सहकारी शिक्षकांच्या मनात एक वेगळे स्थान निर्माण केले. तब्बल ३५ वर्षे १० महिन्यांच्या प्रदीर्घ सेवेनंतर ३० एप्रिल २०२६ रोजी त्या सेवानिवृत्त झाल्या. या कालावधीत त्यांनी अनेक पिढ्या घडवल्या, विद्यार्थ्यांच्या मनात ज्ञानाची ज्योत प्रज्वलित केली आणि शिक्षण क्षेत्रात मोलाचे योगदान दिले. त्यांची कार्यतत्परता आणि सकारात्मक दृष्टिकोन अनेकांसाठी प्रेरणादायी ठरला.

शैक्षणिक कार्याबरोबरच त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला विविध छंदांची सुंदर जोड लाभली आहे. बागकामातून निसर्गाशी संवाद साधणे, विणकाम आणि भरतकामातून कलात्मकतेची जपणूक करणे, वाचनातून ज्ञानसंपदा वाढवणे आणि पर्यटनातून नव्या अनुभवांचा आनंद घेणे, हे त्यांच्या जीवनातील महत्त्वाचे पैलू आहेत. त्यामुळे त्यांचे व्यक्तिमत्त्व बहुआयामी आणि समृद्ध बनले आहे.

सेवानिवृत्ती हा शेवट नसून जीवनातील एका नव्या पर्वाची सुरुवात आहे. आता कुटुंबियांसोबत अधिक वेळ घालवत आपल्या आवडीनिवडी जोपासण्याची आणि आयुष्यातील नव्या स्वप्नांना आकार देण्याची ही सुवर्णसंधी आहे. मुक्ता मिठे यांच्या प्रदीर्घ, समर्पित आणि यशस्वी सेवेस मनःपूर्वक सलाम! त्यांच्या पुढील आयुष्यास उत्तम आरोग्य, आनंद, समाधान, भरभराट आणि दीर्घायुष्य लाभो, हीच सदिच्छा.

**"ज्ञानदानाचा दीप प्रज्वलित ठेवत,**
**संस्कारांची ज्योत चेतवत;**
**कर्तव्यपथावर चालत राहिलात,**
**अनेकांच्या जीवनाला दिशा देत राहिलात.**
**सेवानिवृत्ती हा विराम नव्हे,**
**नव्या स्वप्नांचा सुंदर आरंभ आहे;**
**आपल्या पुढील जीवनप्रवासासाठी**
**मनःपूर्वक शुभेच्छांचा हा स्नेहबंध आहे."**



## वटपौर्णिमा

वटपौर्णिमा (ज्याला वट सावित्री व्रत देखील म्हणतात) हा महाराष्ट्र, गोवा या पश्चिम भारतीय राज्यांमध्ये विवाहित महिलांसाठी साजरा होणारा हिंदू उत्सव आहे. हा उत्सव महाभारतात सांगितल्याप्रमाणे सावित्री आणि सत्यवान यांच्या दंतकथेवर आधारित आहे. वटपौर्णिमेला स्त्रिया वडाच्या झाडाची पूजा करतात. पर्यावरणशास्त्राच्या दृष्टीने वडाचे महत्त्व विशेष असल्याने त्याच्या विषयी कृतज्ञता व्यक्त करणे हा ही पूजेचा एक हेतू आहे

वडाचे झाड मोठ्या प्रमाणात कार्बनडायऑक्साइड शोषून घेते आणि पर्यावरण संतुलित ठेवण्यास मदत करते. त्याची दाट सावली परिसरातील तापमान कमी ठेवण्यास मदत करते. अनेक पक्षी, कीटक आणि इतर जीवांसाठी ते निवारा व अन्नाचा स्त्रोत असते. वटपौर्णिमेचे खरे वैज्ञानिक महत्व म्हणजे पर्यावरण संवर्धन, जैवविविधतेचे संरक्षण, स्वच्छ हवा आणि निसर्गाशी असलेले नाते जपणे होय.

**पार्ले टिळक विद्यालय प्राथमिक**

**Clue 3 :**
**The more we read and explore, the more of this valuable treasure we acquire.**

**पान १ वरील श्लोकाचा अर्थ :** जीवनात सतत समाधानी, सुखी, निरामय राहण्यासाठी ज्ञानी माणसे योग अंगीकारतात.




# Honouring Excellence

The Secondary Section of PTV (ICSE), hosted a felicitation programme to honour the outstanding achievements of its Grade 10 students which was attended by the members of the Board of Directors, parents, teachers, and students.

The programme commenced on an auspicious note with a prayer, invoking blessings for the continued success and well-being of all present. This was followed by a graceful prayer dance that added a touch of devotion and elegance to the occasion.

The function was graced by the esteemed presence of the Board of Directors, Shri. Vinay Jog (Vice President of PTVA) and Mrs Janhavi Khandekar (Chief Academic and Administrative Officer), whose encouragement and support have always been instrumental in fostering a culture of academic excellence within the school. The members of the Board of Directors presented the students with sweets and felicitated the students.

Addressing the gathering, the School Principal, Dr (Mrs) Arnavaz Bhagat, congratulated the students on their remarkable success and commended the unwavering efforts of the teachers and parents who played a significant role in shaping their academic journey. In her inspiring address, she emphasised the importance of hard work, discipline, and resilience as the cornerstones of success.

The audience was further enriched by the reflections shared by Grade 10 students, Tejasvi Abhyankar and Shreyas Velanker. Speaking with confidence and gratitude, they recounted their experiences, challenges, and learning journey, expressing heartfelt appreciation for the guidance and support received from their teachers and school.

Adding a valuable parental perspective to the occasion, Mrs Nutan Seth, Mrs Chaitali Bhatawadekar, and Mr Amol Kshirsagar addressed the gathering. They shared their experiences as parents of successful students and acknowledged the school's nurturing environment, dedicated faculty, and holistic approach to education.

The programme concluded with a sincere Vote of Thanks, expressing gratitude to all who contributed to its success. The ceremony ended on a note of pride and inspiration, leaving the audience motivated to pursue excellence and uphold the values of dedication and perseverance.




# PTVEMS secures 100% result in SSC exams

PTVEMS (Secondary) organised a felicitation programme to celebrate the outstanding performance of its students in the SSC Board Examination 2025–2026. The programme was graced by the President of the PTVA, Shri Anil Ganu, as the Chief Guest.

The event was attended by the teaching and non-teaching staff and the SSC students. The programme was compered by Mrs Komal Jani, Class Teacher of Std. X D. She welcomed the gathering and highlighted the significance of the occasion.

The Headmistress, Mrs Smita Biwalkar, then addressed the gathering and congratulated the students on their excellent performance. She expressed gratitude to Shri Anil Ganu and the PTVA for their continued support and encouragement. She proudly announced that the school had achieved a 100% result in the SSC Examination 2025–2026.

A total of 219 students registered for the examination and all 219 students appeared and passed successfully. Of these, 167 students secured Distinction, 46 secured Grade I and 6 secured Grade II.

The felicitation ceremony followed, during which Shri Anil Ganu honoured the Top Five Rank Holders of the SSC Examination 2026. The achievers received enthusiastic applause from the audience as they were recognised for their hard work, perseverance and dedication.

Addressing the students, Mrs Jani quoted Dr A. P. J. Abdul Kalam's inspiring words, "Dream, dream, dream. Dreams transform into thoughts and thoughts result in action," and encouraged the students to continue striving for excellence in all their future endeavours.

The programme concluded with words of appreciation and encouragement for the students. Gratitude was expressed to Shri Anil Ganu for his gracious presence and for motivating the students through his support and guidance.

The students were congratulated once again and wished success, happiness and fulfilment in the years ahead.

The programme ended on a note of pride and celebration as the Class of 2025–26 embarked on the next stage of their academic journey.

**Clue 4 :** **Following rules, being punctual, and showing self-control are signs of this quality.**

# Topper Talks...




Ketaki Joshi (Std. X D) of PTVEMS was the school topper in the recently concluded SSC exam, scoring 475 + 15 = 490 marks (98.00%). Her achievement is the result of dedication, discipline and consistent effort. Dhaval Mandavkar and Om Bendre interviewed Ketaki to learn from her experiences and gain valuable insights that will guide the current SSC batch in its own academic journey.

**Dhaval:** Did your result match your expectations or surprise you in any way?

**Ketaki:** I was definitely expecting a good score. It felt incredible to see my efforts being paid off.

**Om:** What is one study strategy you followed that many students usually ignore?

**Ketaki:** One strategy which I followed throughout the year was revising the topics I found difficult before going to sleep. This is something students usually ignore. This habit helped me remember those topics really well.

**Dhaval:** What did a 'perfect productive day' look like for you during your SSC preparation?

**Ketaki:** I tried to keep my routine as simple as possible. I used to wake up early every day and study for a minimum of 7–8 hours. I also took small breaks in the evening for reading novels and dancing.

**Om:** Which subject did you find most challenging and how did you overcome it?

**Ketaki:** The subject I found most challenging was Geography. To improve, I solved past year papers and practised map-based questions thoroughly.

**Dhaval:** Did taking breaks actually help your studies?

**Ketaki:** Yes, taking small breaks is very important as it helps you stay consistent and focused for long hours. I made sure to take short breaks between study sessions.

**Om:** Did your routine change as the examinations got closer?

**Ketaki:** As the examinations approached, my study hours increased and I took fewer breaks. At the same time, I prioritised my health and sleep and also practised meditation to reduce stress.

**Dhaval:** Was there a moment when a teacher's, parent's or friend's words changed your mindset or motivated you to work harder?

**Ketaki:** Yes, throughout the year, my parents and teachers encouraged me to stay consistent in my studies and believe in myself. Their words made the entire process less stressful.

**Om:** What is one 'must-do' and one 'must-avoid' for students preparing for the SSC examination?

**Ketaki:** One must-do is solving as many past year papers as possible. One must-avoid is leaving any part of the syllabus as an option. Make sure you cover the entire syllabus before prelim exams.

**Dhaval:** How can students stay confident even when results seem uncertain?

**Ketaki:** Always remember that there is a lot of scope to improve through practice papers. Make sure you get your answers checked. Have faith in yourself and trust your preparation.

**Om:** What makes a school environment ideal for success?

**Ketaki:** As a student, I feel that teachers should be supportive and open to doubts. The peer group should be encouraging, and there should be healthy competition among students.

**Dhaval:** What are your future aspirations and goals?

**Ketaki:** I have taken admission in the Science stream and I wish to pursue a career in Engineering. My goal is to use my skills and ideas for the benefit of society.

**Om:** Do you think marks alone define success?

**Ketaki:** Not at all. Marks alone do not define success. I believe success is defined by your knowledge, hard work, and willingness to improve yourself.

**Dhaval:** If you could give your 'past self' one piece of advice at the beginning of Class X, what would it be?

**Ketaki:** Don't let small failures discourage you, and always trust the process.

# योग साधनेतून निरोगी जीवनाचा संकल्प; आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा


परांजपे विद्यालय माध्यमिक


पार्ले टिळक विद्यालय प्राथमिक


पार्ले टिळक विद्यालय माध्यमिक

दरवर्षी २१ जून हा दिवस आंतरराष्ट्रीय योग दिवस म्हणून जगभर साजरा केला जातो. पार्ले टिळक विद्यालय असोसिएशनच्या शाळांमध्ये योग दिन उत्साहात साजरा झाला.

पार्ले टिळक विद्यालय प्राथमिक मराठी शाळेत योग शिक्षिका सानिका वेलकर यांनी प्रथम ओमकार साधना, प्रार्थना व गुरु वंदना याने कार्यक्रमाची सुरुवात केली. मुलांना सहज जमतील असे सूर्यनमस्कार, ताडासन, पश्चिमोत्तानासन, शवासन प्राणायामाचे प्रकार, ध्यान घेतले व अंतिम प्रार्थना घेतली.

पार्ले टिळक विद्यालय मराठी माध्यम माध्यमिक शाळेत आंतरराष्ट्रीय योग दिन कार्यक्रमात विद्यार्थी, शिक्षक आणि एनसीसी कॅडेट्स यांनी मोठ्या उत्साहाने सहभाग नोंदवला.

कार्यक्रमास विद्यालयाच्या मुख्याध्यापिका सुचेता लघाटे, NCC ANO F/O उमेश शिंदे सर तसेच प्रमाणित योग शिक्षिका सानिका वेलकर यांची प्रमुख उपस्थिती लाभली. या उपक्रमात २४ एनसीसी कॅडेट्स, ७५० विद्यार्थी आणि ३५ शिक्षक-शिक्षिका सहभागी झाले.

कार्यक्रमाची सुरुवात प्रार्थना, ओंकार आणि गुरुवंदनेने झाली. त्यानंतर सर्व सहभागींच्या हस्ते सामूहिकरित्या तीन सूर्यनमस्कार करण्यात आले. योग शिक्षिका सानिका वेलकर यांनी योगाचे महत्त्व विशद करून विविध योगासनांचे प्रात्यक्षिक व मार्गदर्शन केले.

यामध्ये विपरीत स्थितीतील धनुरासन व भुजंगासन, शयनस्थितीतील विष्णुआसन व सेतूबंधासन, बैठक स्थितीतील पश्चिमोत्तानासन व गोमुखासन, तसेच दंड स्थितीतील वीरभद्रासन व त्रिकोणासन यांचा समावेश होता. सर्व विद्यार्थ्यांनी आणि शिक्षकांनी उत्स्फूर्तपणे या योगासनांचा सराव केला.

कार्यक्रमाची सांगता अंतिम प्रार्थनेने करण्यात आली. योगामुळे शारीरिक सुदृढता, मानसिक स्थैर्य आणि निरोगी जीवनशैलीचा संदेश विद्यार्थ्यांपर्यंत प्रभावीपणे पोहोचवण्यात या उपक्रमाला यश आले. विद्यार्थ्यांमध्ये योगाविषयी जागरूकता निर्माण करणारा आणि आरोग्यपूर्ण जीवनाचा संकल्प दृढ करणारा हा कार्यक्रम अत्यंत यशस्वी ठरला.

तसेच परांजपे विद्यालयाच्या माध्यमिक विभागात योग दिनानिमित्त विशेष योग शिबिराचे आयोजन करण्यात आले. हा कार्यक्रम अंबिका योगाश्रम संस्थेच्या वतीने आयोजित करण्यात आला होता.

या प्रसंगी योगतज्ज्ञ विजय दवे व त्यांच्या सहकाऱ्यांनी विविध योगासने, प्राणायाम आणि ध्यान यांची प्रात्यक्षिके सादर केली. योगाभ्यासामुळे शरीर निरोगी, मन प्रसन्न आणि एकाग्रता वाढण्यास कशी मदत होते, याविषयी त्यांनी विद्यार्थ्यांना सविस्तर मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनीही उत्साहाने विविध योगासनांचा सराव करून कार्यक्रमात सक्रिय सहभाग नोंदवला.

या योग शिबिरात विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री. हाक्के सर, सर्व शिक्षकवृंद तसेच शिक्षकेतर कर्मचारी सहभागी झाले. मुख्याध्यापकांनी आपल्या मनोगतातून विद्यार्थ्यांना योगाचे दैनंदिन जीवनातील महत्त्व, निरोगी आरोग्यासाठी त्याची आवश्यकता आणि नियमित योगाभ्यासाचे फायदे समजावून सांगितले.

अंबिका योगाश्रम संस्थेच्या सहकार्याने आयोजित करण्यात आलेला हा उपक्रम विद्यार्थ्यांसाठी आरोग्य, शिस्त आणि सकारात्मक जीवनमूल्यांचा संदेश देणारा ठरला.

"योग ही भारतीय संस्कृतीची अमूल्य देणगी असून निरोगी जीवनाचा पाया आहे," हा संदेश या कार्यक्रमातून प्रभावीपणे विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचला.


PTV ICSE (Secondary)


PTV ICSE (Primary)

**Clue 5:** Consistently giving your best and striving for high standards leads to this.

# PTVA Schools flex their Yoga Spirit

International Yoga Day was celebrated across different PTVA schools with great fervour.

PTVEMS (Primary) rang in the celebrations with immense zeal. This year's theme, "Yoga for Healthy Ageing" reminded us that yoga is a lifelong companion for a healthy body and peaceful mind. Students shared the significance of yoga and how it helps people stay active, flexible, and calm at every age. Under the guidance of PE teachers, students from Std. 1 to 4 and staff performed simple asanas, pranayama, and meditation together on the school ground. Headmistress Mrs Sunita Bhagwat emphasised that starting yoga early builds strong habits. A healthy teacher, a healthy student — together we build a healthy PTVEMS family. The celebration showed us that yoga isn't just about bending or stretching. It's about balance, discipline, and caring for ourselves as we grow.


PTVEMS (Secondary)


PTVEMS (Primary)

Similarly, at PTVEMS (Secondary), the 12th International Day of Yoga was celebrated enthusiastically by the students of Std. V to X. The programme was conducted by Mr Rishabh Upadhyay and his team from New Age Yoga Institute, whose expertise and engaging approach made the sessions both informative and enjoyable. The activities included classroom sessions led by experienced yoga instructors as well as practical sessions in the school hall. Students were introduced to the importance of yoga and holistic well-being. They practised neuro-muscular exercises designed to enhance alertness, concentration and memory. Guided meditation techniques helped them experience relaxation, mindfulness and inner calm. A special session was also organised for the staff members during which valuable tips on maintaining physical and mental well-being were shared. The participants also practised simple relaxation techniques that can be incorporated into daily life. The school extends its heartfelt gratitude to Mr Rishabh Upadhyay and the entire team of New Age Yoga Institute for their dedication, guidance and inspiring sessions. Their efforts encouraged students and staff alike to embrace yoga as a way of life and to appreciate its lasting benefits for physical, mental and emotional well-being.

PTV ICSE (Secondary) marked International Yoga Day with reverence. The event was attended by Mr Nitin Patki (Certified Yoga Master and Certified Yoga Therapist) and Mrs Sandhya Patki (Founder and Principal of NEW AGE YOGA INSTITUTE), whose presence added dignity to the occasion. The programme commenced with the chanting of the opening Yoga Mantra, creating a serene and positive atmosphere. This was followed by a synchronised Surya Namaskar demonstration and a series of asana performances, where students beautifully showcased various yoga postures along with their health benefits. A captivating Musical Yoga Performance added a creative touch to the celebration, highlighting the harmony between movement and music. A special yoga session conducted by the esteemed guest, Mr Patki, inspired students to embrace yoga as a way of life for physical fitness and mental well-being. The event concluded with the chanting of the closing Yoga Mantra, leaving everyone with a sense of peace, gratitude, and renewed energy. The celebration served as a meaningful reminder of the importance of yoga in nurturing a healthy body, a calm mind, and a balanced life.

At PTV ICSE (Primary), International Yoga Day was observed on 19 June with a special assembly focused on health, mindfulness and well-being. The programme began with an auspicious shloka, creating a serene and positive atmosphere. The assembly was graced by Mrs Sandhya Patki, Founder and Principal of the New Age Yoga Institute and a renowned yoga educator. During her interactive session, she emphasised the importance of incorporating yoga into daily life and guided students through simple asanas and spine-strengthening exercises that help improve posture and overall fitness. Adding to the spirit of the occasion, students of Grades III and V presented a graceful yoga performance display, demonstrating flexibility, balance and concentration. The assembly concluded with a vote of thanks, inspiring students to adopt yoga as a lifelong practice for a healthy body and a peaceful mind.

# सुट्टीतील एक अविस्मरणीय अनुभव 'Thunder World - Goa'

या उन्हाळी सुट्टीत आम्ही गोवा येथे फिरायला गेलो होतो. स्वच्छ समुद्रकिनारे, हिरवागार निसर्ग, ऐतिहासिक चर्च आणि मंदिरे यांसाठी ते प्रसिद्ध आहे. गोव्यात भारतीय संस्कृती व पोर्तुगीज संस्कृतीचा सुंदर मिलाफ पाहायला मिळतो. येथील पर्यटन स्थळे, खाद्यसंस्कृती, लोककला, उत्सव आणि पाहुणचार यामुळे गोवा हे राज्य देश-विदेशातील पर्यटकांचे आकर्षण ठरते.

गोव्यामध्ये फिरताना मी अनेक सुंदर ठिकाणांना भेट दिली. येथील प्रसिद्ध मंदिरे, देवस्थाने, दुर्ग, किल्ले तसेच समुद्राचा मनमुराद आनंद लुटला. पण विशेष आकर्षण ठरले थंडर वर्ल्ड (Thunder World) ला दिलेली भेट.

Thunder World हे विज्ञान आणि मनोरंजन यांचा संगम असलेले एक अनोखे विज्ञान उद्यान आहे. येथे महान शास्त्रज्ञ निकोला टेस्ला यांच्या संशोधनावर आधारित अनेक आकर्षक प्रयोग पाहायला मिळाले. तिथे आम्ही प्रवेश केल्यापासूनच कुतूहल आणि सुरुवातीला थोडी भीतीही वाटत होती. या अनोख्या सफरीत एक-एक करून मी तेथील प्रयोगांचा अनुभव घेत होतो.

**प्लाझ्मा बॉल (Plasma Ball) :** हा एक काचेचा गोलाकार दिवा आहे, त्याच्या आत रंगीत विद्युत किरणे फिरताना दिसत होती. जसा मी माझा हात बॉलवर ठेवला, तसे त्यातील किरण माझ्या बोटांकडे आकर्षित झाले. जणू माझ्या बोटांशीच काहीतरी जादू करत आहेत असे वाटले.

स्थिर विद्युत प्रयोग (Static Electricity Experiment) या कक्षेत आत एक धातूचा गोळा होता. त्याला हात लावून उभे राहायचे होते. मग विद्युत प्रवाह सुरू झाला आणि डोक्यावरील केस तारेसारखे उभे राहिले.

**टेस्ला कॉईल (Tesla Coil) :** उच्च दाबाची वीज निर्माण करणारे हे उपकरण होते. या उपकरणातून मोठ्या विद्युत ठिणग्या बाहेर पडताना दिसल्या. त्यासाठी मी आणि माझा जोडीदार एका काचेच्या रूममध्ये गेलो. तिथे एक बॉक्स होता. त्या बॉक्समध्ये लोखंडी जाळीचे हातमोजे होते. त्याच्या सहाय्याने हात त्या बॉक्समध्ये घातला, तसा विद्युत प्रवाह फिरू लागला. कधी माझ्या हातावर तर हाताची हालचाल केल्यावर माझ्या जोडीदाराच्या हातावर. वायरलेस पद्धतीने ऊर्जा कशी वाहते हे इथे पाहायला मिळाले. त्यामुळे खूपच आश्चर्य वाटले.

**Clue 6 :** Great achievements and noble deeds often bring this honor and recognition.

**चुंबकत्वाचे प्रयोग (Magnetism Experiment)** यामध्ये वेगवेगळे प्रकार होते. पहिल्या काचेच्या खोलीत एका हातात लोखंडी जाळीचा हातमोजा आणि एका हातात ढाल धरली होती. हातमोजा घातलेला हात वरच्या बाजूला असलेल्या लोखंडी बॉलकडे नेत असताना विजेच्या तारा निर्माण झाल्या.




पुढे एका फ्रेममध्ये उभे केले आणि धनुष्यबाण धरायला दिले. बाणाचे टोक वरच्या बाजूला धरले असता त्यात विजेच्या तारा निर्माण झाल्या.

पुढे आपल्या उंचीच्या ढालेसमोर उभे करून हातात एक हातोडा पकडायला दिला. तोही वर धरला तर त्यातूनही विजा चमकू लागल्या. आम्ही एका विज्ञान नगरीत आल्याचा अनुभव घेतला.

**फॅराडे केज (Faraday Cage) :** लोखंडी जाळीच्या पिंजऱ्यात मी आणि माझे कुटुंबीय जाऊन उभे राहिलो. त्यानंतर तो पिंजरा बंद करण्यात आला. बाहेरून उच्च दाबाची वीज निर्माण करण्यात आली. त्यामुळे पिंजऱ्याबाहेर विजेच्या ठिणग्या आणि तारा चमकू लागल्या. मात्र आम्हाला कोणतीही इजा झाली नाही. हा अनुभव अतिशय रोमांचकारी आणि अविस्मरणीय होता.

**Thunder आणि Lightning Show :** हा सुमारे १५ ते २० मिनिटांचा शो होता. या शोमध्ये एक विशेष काचेची मोठी खोली होती. त्या खोलीत एक व्यक्ती संगीत आणि नृत्यासोबत विविध विजेची प्रात्यक्षिके करून दाखवत होती. त्यासाठी त्या व्यक्तीने विशेष सूट परिधान केला होता. त्या सूटला Faraday Suit किंवा Conductive Suit म्हणतात. या सूटमुळे विद्युत प्रवाह शरीराच्या आत न जाता कपड्यांच्या पृष्ठभागावरून वाहतो आणि व्यक्ती सुरक्षित राहते. या शोमध्ये कृत्रिम वीज, गडगडाट आणि प्रकाश यांचे अतिशय सुंदर सादरीकरण करण्यात आले.

मला येथे आल्यामुळे विद्युत प्रवाह आणि चुंबकत्व यांवरील प्रयोग प्रत्यक्ष अनुभवता आले. त्यामुळे शिकणे अधिक सोपे झाले. पुस्तकात वाचलेल्या वैज्ञानिक संकल्पना अधिक स्पष्ट झाल्या. विशेषतः प्लाझ्मा बॉलचा प्रयोग मला खूप आवडला. या भेटीमुळे विज्ञानाविषयीची माझी उत्सुकता आणि आवड आणखी वाढली.

**- सार्थक विनय शिगवण ९/४**
**पार्ले टिळक विद्यालय मराठी माध्यमिक शाळा**

# मे महिन्याच्या सुट्टीतील अनुभव

"अथर्व, अभ्यासाला बस!" हे वाक्य ऐकून कंटाळलेलो मी. शेवटचा पेपर संपल्याची घंटा वाजताच अक्षरशः हवेतच उडालो. कारण समोर उभे होते तब्बल पन्नास दिवसांचे स्वातंत्र्य, म्हणजे माझी उन्हाळी सुट्टी! यंदा सहावीची परीक्षा संपली आणि सातवीत जाण्याचा आनंद तर होताच, पण त्याहून जास्त उत्सुकता होती ती सुट्टीची.

सुट्टीची सुरुवात आम्ही सोलापूर, कोल्हापूर आणि अक्कलकोट येथील देवदर्शनाने केली. देवाला नमस्कार करताना मी एक गुपित मागितले होते - "देवा, यंदाची सुट्टी एकदम झकास जाऊ दे !" आणि बहुतेक देवाने माझे ऐकले असावे. यानंतर आम्ही रत्नागिरीला गेलो. निमित्त होते, माझ्या आबांचे "शेलार इस्टेट"च्या गृहप्रवेशाचे. प्रवासात वडापाव, थालीपीठ आणि खाऊ यांच्यावर असा काही ताव मारला की गाडी पेट्रोलवर चालत होती की आमच्या खाण्यावर, असा प्रश्न पडावा.



रत्नागिरीत पोहोचल्यावर माझे दिवस एकदम स्वर्गच झाले. आबा, माई आजी आणि मामाच्या लाडात मी अक्षरशः व्हीआयपी पाहुणा झालो होतो. सकाळी आमराईत जाऊन झाडावर चढून आंबे तोडायचे. काजू खायचे, जांभळे गोळा करायची आणि दिवसभर खेळायचे. फक्त एकच गोष्ट माझा पाठलाग करत होती - आईने लावून दिलेला अबॅकस क्लास ! पण तो संपला की पुन्हा माझी धम्माल सुरू व्हायची. मला वाटत होते ही मज्जा कधीच संपू नये. पण बाबांच्या परदेशी दौऱ्यामुळे गावची सुट्टी थोडी लवकर संपवून आम्हाला मुंबईला परतावे लागले. माझ्या सुट्टीच्या सिनेमात इंटरव्हल झाला होता जणू!

बाबा परत आल्यावर आम्ही अलिबागला गेलो. स्वच्छ अलिबाग बीचवर समुद्राच्या लाटांशी खेळताना वेळेचे भानच राहिले नाही. एटीव्ही राईड करताना मी स्वत:ला एखादा रेसर समजू लागलो होतो. उंटावर बसण्याचे धाडस मात्र झाले नाही. तो मला बघून हसत होता की मी त्याला बघून घाबरत होतो, हे अजूनही कोडेच आहे. समुद्रकिनाऱ्यावर मिळालेला स्टारफिश, शिंपले आणि चमकदार कवच मी अगदी खजिन्यासारखे जपून ठेवले आहे. वाळूचे किल्ले बांधले आणि एका क्षणी तर स्वतःलाच वाळूत पुरुन घेतले. परतीच्या वाटेवर बाबांनी मला एक जबरदस्त सरप्राईज दिले. आम्ही लोअर परेल येथील "म्युझियम ऑफ सोल्यूशन्स (Muso)" मध्ये गेलो. तब्बल एक लाख चौरस फुटांहून अधिक जागेत पसरलेल्या या अद्भुत जगात विज्ञान, कला, खेळ आणि कल्पनाशक्ती याचा भन्नाट संगम पाहायला मिळाला. प्ले लॅबमध्ये मी कथाकथन आणि ॲनिमेशनच्या दुनियेत शिरलो. डिस्कव्हर लॅबमधील मॅंग्रोव्ह बोगद्यातून फिरताना मी जणू एखाद्या जंगल मोहिमेवर निघालो होतो. मेक लॅबमध्ये सर्जनशीलतेचे पंख मिळाले, तर ग्रो लॅबमध्ये छतावरील सुंदर बागेतून निसर्ग आणि अन्नचक्राचे धडे मजेत शिकायला मिळाले. माझ्यासाठी सगळ्यात भारी आकर्षण होते, खऱ्या मर्सीडीज गाड्या! गाडीचे इंजिन, पार्टस्, चाके आणि गाडीची संपूर्ण यंत्रणा इतक्या जवळून पाहिली की काही वेळासाठी मी स्वतःलाच इंजिनीअर समजू लागलो होतो. वाऱ्याचा दाब, पाण्याचा दाब, वैज्ञानिक प्रयोग, फिशिंग, गेम्स, पझल्स, बाईक गेम्स आणि अनेक भन्नाट टास्क पूर्ण करत मी इतका रमलो की वेळ कसा गेला ते कळलंच नाही. अजूनही खूप काही पाहायचे राहिले आहे. त्यामुळे पुढच्या सुट्टीत पूर्ण दिवस Muso मध्ये घालवायचा मी पक्का निर्णय घेतला आहे.

अजून एक मोठ्ठे सरप्राईज बाकी होते! सुट्टी संपत आली होती. माझे आबा आणि माई आजी आमच्या मुंबईच्या घरी आले. दरवर्षी माझ्या वाढदिवसाला ते मला एक खास भेट देतात. यंदा माझा वाढदिवस परीक्षांच्या गडबडीत गेल्यामुळे ती भेट राहून गेली होती. आता मी सातवीत जाणार असल्यामुळे ते यावेळी खास बक्षीस घेऊन आले होते. मी उत्सुकतेने गिफ्ट उघडले आणि क्षणभर थक्कच झालो. माझ्यासमोर एक मोठ्ठा, झकास कॅरम बोर्ड होता! त्याक्षणी मला वाटले, "वा ! माझ्या सुट्टीचा खरा सुपरस्टार तर आता आला!" लगेच घरी कॅरमचे डाव रंगू लागले. सुट्टी संपली तरी मजा संपणार नव्हती, याची खात्रीच मिळाली.

आणि मग.... १४ जून उजाडला. आईचा परिचित आवाज कानावर पडला "अथर्व, आवर लवकर! उद्या शाळा आहे." तो आवाज ऐकताच मला असे वाटले, जणू एखाद्या रोमांचक चित्रपटाचा शेवट अजून बाकी असताना अचानक पडदा खाली आला! सुट्टी संपली खरी, पण तिने मला खूप काही दिले. कुटुंबासोबतचे सुंदर क्षण, निसर्गाची ओढ, विज्ञानाची आवड, नवीन अनुभव आणि भरपूर आनंद.

आजही, मला कॅरम बोर्ड पाहिला की माझी संपूर्ण उन्हाळी सुट्टी पुन्हा डोळ्यासमोर उभी राहते. माझ्यासाठी यंदाची उन्हाळी सुट्टी ही फक्त सुट्टी नव्हती तर आनंद, साहस, विज्ञान, प्रेम आणि सुंदर आठवणींनी भरलेली आयुष्याची एक अविस्मरणीय सफर होती.

**- अथर्व अभिजीत निंबाळकर ७/३**
**पार्ले टिळक विद्यालय मराठी माध्यमिक शाळा**

# माझी उन्हाळी सुट्टी

या वर्षीची उन्हाळी सुट्टी माझ्यासाठी खूप खास होती. सुट्टी आणि मामाचं गाव हे समीकरण बहुदा ठरलेलंच. त्यामुळे मीही यावर्षी मामाच्या गावाला ओझरला (राजापूर) गेले. मामा-मामीने केलेले लाड, आजीने प्रेमाने खाऊ घातलेले विविध पदार्थ, भावंडांबरोबर केलेली भरपूर मजा आणि फिरणं, आठवडी बाजारात मारलेला फेरफटका यामुळे आठ दिवस तर फुलपाखरासारखे भुरकन उडून गेले. बाबांच्या कामानिमित्त आम्हाला मुंबईला लवकर परत यावं लागलं, म्हणून वाईटही वाटलं. पण इथे आल्यानंतर मी माझा वेळ कारणी लावायचा ठरवलं.



या सुट्टीत मी माझ्या आवडत्या छंदांनाही वेळ दिला. मला पेंटिंग करायला खूप आवडते. कार्टून, ॲनिमेशन करेक्टर्स, गणपती बाप्पा आणि इतर अनेक चित्रे मी काढली. चित्र काढताना मला खूप आनंद मिळतो. तसेच मी पाइप क्लिनरपासून हॅण्डमेड फुले बनवायलाही शिकले. ही माझ्यासाठी नवीन गोष्ट होती. सुरुवातीला थोडे अवघड वाटले, पण नंतर सुंदर फुले तयार झाली तेव्हा खूप आनंद झाला. मी तर अनेकांना ही फुले बनवून दिली तेव्हा त्यांनी माझं खूप कौतुकही केलं. सुट्टीतील सर्वात आवडलेली गोष्ट म्हणजे कुटुंबासोबत घालवलेला वेळ. आजी-आजोबा, मामा-मामी आणि आणि इतर सर्वांसोबत घालवलेले क्षण व नवीन कला आत्मसात केली, हे माझ्यासाठी खूप खास होते. या सुट्टीमुळे मला अनेक सुंदर आठवणी मिळाल्या.

**- ईश्वरी सुनील जडीयार ९/४**
**पार्ले टिळक विद्यालय मराठी माध्यमिक शाळा**

# सुट्टीतील मज्जा

मे महिना म्हणजे सगळ्यांचा आवडता महिना आणि हळवा कोपरा!

परीक्षा संपल्यानंतर मी दरवर्षीप्रमाणे माझ्या कोकणातील गावी गेले. कोकण म्हटलं की चुलीवर बनवलेले घावणे, गरमागरम चहा आणि खूप काही आठवते. आम्ही गावी येणार हे समजल्यावर आजीने आधीच सगळी तयारी करून ठेवली होती. यावर्षी आमच्या फणसाच्या झाडाला अनेक वर्षांनंतर फणस लागले होते. जांभूळ, पेरू, चिकू, करवंद आणि आंब्यांनीही बाग बहरली होती. या सर्व फळांचा एक सुगंध मी तिकडच्या वातावरणात अनुभवत होते. माझी काकी आणि बहीण या दोघी माझ्या खास मैत्रिणी असल्यामुळे सुट्टी आणखी मजेशीर झाली.



संध्याकाळी आम्ही शेतात फिरून रानमेवा खायचो. एक दिवस आम्ही सातेरी देवीच्या मंदिरात गेलो. तेथे उत्सवानिमित्त खूप गर्दी होती, पण दर्शन घेतल्यानंतर खूप समाधान वाटलं. मंदिराजवळील शांत तलावही खूप सुंदर होता. सुट्टीत आम्ही कायाकिंगलाही गेलो. खारफुटीच्या झाडांमध्ये नाव चालवण्याचा अनुभव खूप रोमांचकारी होता. त्यानंतर समुद्रकिनाऱ्यावर लाटांमध्ये खेळताना वेळ कसा गेला ते कळलंच नाही.

माझी काकी चित्रकलेची शिक्षिका असल्यामुळे तिने मला चित्रकलेचे धडे दिले. मला विणकामाचीही आवड आहे. मी विणलेला गजरा काकीला इतका आवडला की मी तिच्यासाठी गजरा विणून दिल्यावर तिच्या डोळ्यातला आनंद मला जाणवत होता. काकीसोबतच्या गप्पा, बहिणीसोबतची धमाल, समुद्रकिनारी घालवलेले क्षण आणि गावातील निसर्गरम्य वातावरण यामुळे ही सुट्टी माझ्यासाठी खूप खास ठरली. आता पुन्हा शाळा सुरू होणार असली तरी या सुट्टीच्या आठवणी कायम माझ्यासोबत राहतील!


**- भुवी ओंकार तोरसकर ८/२**
**पार्ले टिळक विद्यालय मराठी माध्यमिक शाळा**

# माझी उन्हाळी सुट्टीतील भटकंती

**"निसर्गाच्या कुशीत शोधते**
**रोज मी एक नवी वाट,**
**भटकंतीची मजा घेत**
**माझ्या आनंदाची उसळूनी आली लाट!"**

दरवर्षीप्रमाणे यावर्षी देखील माझा छंद जोपासण्यासाठी व सुट्टीचा आनंद घेण्यासाठी मी माझ्या कुटुंबासोबत माझ्या गावी गेले होते. गावी वेंगुर्ल्याला गेल्यावर तिकडच्या समुद्रकिनाऱ्याजवळ आमचं घर असल्यामुळे मी सतत प्राणवायूने समृद्ध झाडांच्या थंड सावलीत बसलेले असायचे. कोकणातला निसर्ग अनुभवण्यासाठी अनेक पर्यटक खूप सगळे पैसे खर्च करून येतात. परंतु आम्ही त्या भूमीतले म्हणून आम्हाला तो सहज आणि वारंवार अनुभवायला मिळतो म्हणून मी स्वतःला भाग्यवान समजते.

यावर्षी आम्ही गावाच्या जवळपास असणाऱ्या पर्यटन स्थळांची माहिती गोळा करून वेळ व दिवस निश्चित करून तिथे भटकंती करण्यासाठी जायचे ठरवले. आम्ही गणपतीपुळे, आरे-वारे, जयगड किल्ला, मालगुंड समुद्र किनारा अशी ठिकाणे फिरण्यासाठी गेलो. अशी ही माझी सुट्टी भटकंती करत, नवीन अनुभव घेत मी घालवली.



**स्वरा किरण आडाव १०/४**
**पार्ले टिळक विद्यालय विद्यालय मराठी माध्यमिक शाळा**

# Raising awareness about child rights

To mark World Day Against Child Labour, students of PTVEMS (Secondary) presented a short skit to raise awareness about the importance of education and the rights of every child.

Through this impactful performance, students highlighted the harsh realities faced by children engaged in labour and emphasised the need for freedom, dignity and access to education. The skit conveyed a strong message about the responsibility of society to protect childhood and ensure a better future for every child.

The video of this student initiative has been uploaded on YouTube.

**Scan the QR code to watch the video of student's message on child rights and education.**

# Grooving to the Rhythms of Joy



PTV (ICSE) organised an energetic and vibrant Mass Dance Class for the students of Grades 3 to 5, on the occasion of International Dance Day, celebrated on 29 April. The session was conducted by the school's talented dance teacher, Ms Vaishnavi, who enthusiastically guided the students through an exciting celebration of rhythm and movement.

The event began with a lively warm-up session that filled the atmosphere with energy and excitement. Students enthusiastically explored iconic dance styles such as tap, jazz, hip-hop, and disco, learning different movements and expressions associated with each form. The activity encouraged students to express themselves freely while also enhancing their coordination, confidence, and sense of rhythm.

The session culminated in a vibrant freestyle finale, where students joyfully blended all the dance moves they had learnt. The enthusiasm and cheerful participation of the students made the celebration truly memorable. It was a perfect blend of learning and fun, leaving everyone energised, delighted, and inspired by the joy of dance.

# Celebrating the Power and Beauty op Music

On the occasion of World Music Day, students of PTVEMS (Secondary) presented a creative dialogue celebrating the power and beauty of music.

Through this meaningful exchange student singers trained in music shared their experiences about the joy, discipline, emotions and healing power of music. The dialogue highlighted how music connects people, expresses feelings beyond words and plays an important role in personal growth and well-being.

The video of this student presentation has been uploaded on YouTube.

**Scan the QR code to watch the video of students' reflections on music.**

# Think Before You Click

**On the eve of World Social Media Day**



Social media has become an important part of our lives. It helps us connect with friends, learn new things and share our thoughts. While it is useful, we must use it responsibly. Before we post, share or click on anything online, we should think about how it may affect us and others.

One major problem on social media is the spread of rumours and fake news. Many people share information without checking whether it is true, which can create fear and confusion. We should always verify information before sharing it. We should also avoid clicking on unknown links or messages, as they may contain scams designed to steal personal information.

Online safety is equally important. Sharing too much information, such as our location or daily routine, can be risky. We should be cautious about accepting friend requests from strangers because people online are not always who they claim to be.

Our words can also affect others. Rude comments and cyberbullying can harm a person's mental health and self-confidence. We should always be kind and respectful and remember that there is a real person behind every screen.

Maintaining a healthy digital balance is essential. Spending too much time on social media can affect our studies, health and relationships. We should limit our screen time and make time for family, friends, sports and hobbies.

On this World Social Media Day, let us promise to think before we click. By sharing truthful information, staying safe online, maintaining a healthy digital balance and spreading kindness, we can make the internet a better place for everyone.

**Raksha Mithbavkar**
**(Std. IX C), PTVEMS**

# Statistics: Data in Action

**On the eve of National Statistics Day**



Have you wondered, how our apps tell us exactly what we are looking for. They predict accurately the next events. For e.g. the weather app tells us the exact times for the rains on an hourly basis. YouTube and Spotify prepare a playlist of our choice.

What is used for all this and almost everything in our daily lives is 'Statistics'.

It is a branch of math but can be called the art of collecting numbers, spotting patterns and using clues to understand and predict the world around us.

COD of statistics is Collect, Organise and Display.

The 3 Ms are Mean (Average), Median and Mode.

The tools used in statistics can turn a big jumble of numbers and information into a clear story. The recent 'census' that is being carried out will give us digital information about the population of our country using statistics.

Once the data is analysed it will be used to decide economic plans, understand demographic changes, allocation of funds and infrastructure development. Statistics also help in deciding plans for improving school structures, setting syllabus and conducting exams and processing results.

All the information is made easy using graphs, charts and even animations.

The data can be used to prove theories, explain facts and plan for the future.

For e.g. stats helps us to show that students who eat breakfast, feel more energetic all day and do better at school. Game developers use data retrieved from video games to make them more engaging.

Statistics runs our entire day.

It is a doubled- edged sword that can be selectively used to arrive at opposite conclusions.

Try this: Data Detective


Try to guess the colour that will have the highest count in a Gems pack before opening it. Open the pack and sort them according to colour. Check if you were right.

On 29th June each year, we celebrate the National Statistics Day to commemorate the birth anniversary of Prof. P.C. Mahalanobis (1893 – 1972). He is hailed as the 'Father of Indian Statistics'. He is credited for founding the Indian Statistical institute and establishing the National Sample Survey office.

**Ms Minal Deo, Teacher, PTVEMS (Secondary)**

# उन्हाळी अयनदिन : खगोलशास्त्रीयदृष्ट्या अत्यंत महत्त्वाचा दिवस






उत्तरायण व दक्षिणायन (Summer Solstice and Winter Solstice)

उन्हाळी अयनदिन (Summer Solstice) म्हणजे वर्षातील असा दिवस ज्या दिवशी उत्तर गोलार्धात दिवस मोठा आणि रात्र लहान असते. या दिवशी सूर्याचे किरण कर्कवृत्तावर (Tropic of Cancer) लंबरूप पडतात. यानंतर दिवस हळूहळू लहान व रात्र मोठी होऊ लागते. अयनदिन हे वर्षातील असे दोन दिवस असतात की ज्या दिवशी सूर्य त्याच्या उत्तरेच्या किंवा दक्षिणेच्या स्थानी असतो. २१ जून व २२ डिसेंबर या दोन दिवशी अशी स्थिती असते. म्हणून या दिवसांना 'अयनदिन' असे म्हणतात.

खरे पाहता पृथ्वीचे परिभ्रमण, तिच्या आसाचा त्याच्या कक्षेशी असलेला ६६.५० चा कोन आणि तिच्या आसाचा सतत एकाच दिशेकडे असलेला कल या कारणांमुळे कोणत्याही ठिकाणी दररोज दुपारचा सूर्य आकाशात एकाच ठिकाणी दिसत नाही. २१ जूनपासून २२ डिसेंबरपर्यंत दररोज आदल्या दिवसापेक्षा सूर्य अधिकाधिक दक्षिणेस गेलेला दिसतो. तर २२ डिसेंबरपासून २१ जूनपर्यंत तो दररोज आदल्या दिवसापेक्षा अधिकाधिक उत्तरेस गेलेला दिसतो. अशाप्रकारे सूर्याच्या या उत्तरेकडून दक्षिणेकडे व दक्षिणेकडून उत्तरेकडे होणाऱ्या भासमान भ्रमणाला अनुक्रमे 'दक्षिणायन' व 'उत्तरायण' म्हणतात. यातील २१ जून रोजी सूर्याचे उत्तरायण पूर्ण होऊन दक्षिणायन सुरू होते. या दिवशी पृथ्वी स्वतःच्या अक्षाभोवती २३.५० अंशानी कललेली असल्यामुळे पृथ्वीचा उत्तर ध्रुव सूर्याकडे कललेला असतो. या दिवशी सूर्य कर्कवृत्तावर थेट माथ्यावर आलेला असतो. म्हणून यास 'उन्हाळी अयनदिन' असे म्हणतात. या दिवशी सूर्याचा आकाशातील मार्ग सर्वात मोठा असतो. त्यामुळे सूर्य क्षितिजावर जास्त वेळ दिसतो. म्हणून दिवस मोठा व रात्र लहान अशी स्थिती दिसते. सूर्य आकाशात जास्त उंचीवर दिसतो. सूर्योदय लवकर व सूर्यास्त उशिरा होतो. त्यामुळे दिवसाचा कालावधी सर्वाधिक असतो. याउलट दक्षिण गोलार्धात दिवस लहान व रात्र सर्वात मोठी असते.

भारत उत्तर गोलार्धात असल्यामुळे हा दिवस भारताला अनुभवता येतो. भारतातील वेगवेगळ्या भागात दिवसाची लांबी वेगवेगळी असते. भारताच्या उत्तरेकडील भागात दक्षिण भारतापेक्षा दिवस अधिक मोठा असतो.

खगोलशास्त्र व मानवी जीवन, संस्कृती व परंपरा यांच्या घनिष्ठ संबंधामुळेच उत्तर गोलार्धातील अनेक देशांमध्ये या दिवसानिमित्त सांस्कृतिक व पारंपरिक उत्सव साजरे केले जातात. या दिवशी भारतातही सूर्य पूजा केली जाते. शेती आणि ऋतू परिवर्तनाच्या दृष्टीने या दिवसाचे महत्त्व अनन्यसाधारण आहे.

खगोलीय घटना आपल्या जीवनाशी किती निगडित आहेत हे समजले असेलच ना! मग अशा प्रकारच्या आणखी अनेक खगोलीय घटनांचा शोध घ्या आणि त्याची नोंद घ्या.

**- जया परब, शिक्षिका,**
**पार्ले टिळक विद्यालय माध्यमिक**


# When the river speaks its heart out...

I begin my journey as a tiny stream, born from melting snow and rainfall high in the mountains. From there, I make my way towards the vast and endless sea. I play hide-and-seek with the fluffy clouds that drift above me and weave my way through twists and turns down the mountainside.

As I tumble downhill, many other streams join me. Together, we grow stronger until I become a river. The warm rays of the sun gently kiss my sparkling waters, making me shimmer in the daylight. Fish swim happily within me, their colourful tails darting through my clear waters.

After flowing for many miles, I reach the foot of the mountain and enter a broad plateau. There, I see a small village nearby. As I flow closer, I admire the beautiful terracotta houses and the cheerful villagers going about their daily chores. People bathe in my waters and bring their cattle to drink from me. My pace slows as I meander across the plain.

Soon, I enter a forest. Tall trees line my banks and provide cool shade. I hear the rustling of leaves and catch sight of graceful deer moving through the undergrowth. It is a beautiful and peaceful place.




On the eve of World Oceans Day celebrated on 8 June



I continue my journey and eventually encounter a huge wall—a dam. It stores and regulates much of my water, but I continue my journey beyond it. As I flow further, the scenery begins to change. I start seeing tall buildings and busy roads. Pipes draw water from me to supply homes, offices and industries. Towering buildings and magnificent bridges stand proudly along my banks.

However, not everything is pleasant. I notice large pipes releasing dirty water into me. My once-clear waters become murky and polluted. The fresh smell of nature is replaced by an unpleasant odour. Many fish and other aquatic creatures begin to suffer because of the pollution.

At last, I reach the ocean. I merge with its vast waters and become part of something much greater than myself. There, I learn a wonderful secret—the water cycle. Through evaporation, I will rise into the sky, form clouds and return to the mountains as rain or snow, beginning my journey once again.

Yet I have one wish. I wish people would stop polluting me and protect me for future generations. I have only one message:

"From mountain snow to the sea, keep me pollution-free!"

**Ananya Sarfare**
**(Std. IX C), PTVEMS**

# Promoting Ecological Responsibility

On the occasion of World Environment Day, PTV (ICSE) organised a "Sanjeevani Activity" to promote environmental consciousness among the students.

Students of grades 9 and 10 enthusiastically planted saplings in pots and arranged hanging planters across the school premises, contributing to a greener campus. The activity emphasised the significance of sustainability and ecological responsibility.

The initiative proved to be both enriching and inspiring, encouraging students to adopt environmentally responsible practices in their daily lives.



The activity aligns with the objectives of the National Education Policy (NEP) 2020 that advocates the integration of environmental awareness and sustainable practices within education, encouraging students to cultivate sensitivity towards conservation and ecological well-being.




# Small steps, Big impact

PTV (ICSE) celebrated World Earth Day on 22 April with a vibrant assembly aligned with the theme, "Our Power, Our Planet."

Students of Grades III to V presented engaging song, dance and a meaningful skit highlighting the Earth's changing face and the need for responsible action. A video on the school's Sanjeevani Project showcased efforts towards a greener, more sustainable campus.

The celebration concluded with a pledge by students and staff to protect and preserve the environment.

# Inculcating the habit of reading among D.E.A.R students



To mark National Reading Day, PTV (ICSE) organised a special D.E.A.R. (Drop Everything And Read) activity for students of Grades I to V on 18 June.

The initiative encouraged students to pause their regular routine and dedicate time to the simple yet enriching habit of reading. For one hour, the entire school was immersed in books, creating a calm and focused reading environment. Students brought age-appropriate books of their choice and spent the session exploring different genres, stories and ideas.

It was heartening to see students engaged in silent, uninterrupted reading, experiencing the joy and wonder that books bring.

The D.E.A.R. activity served as a meaningful reminder that reading opens doors to knowledge, imagination and endless possibilities.




# Old is Gold

PTV ICSE (Primary) observed World Elder Abuse Awareness Day with a special Gratitude Wall Activity for the students of Grades I and II.

Teachers first explained the significance of the day and emphasised the importance of treating elders with love, respect, and care. Students then expressed their appreciation for their grandparents and elderly family members by sharing photographs along with heartfelt messages and cherished memories.

The beautifully displayed Gratitude Wall served as a meaningful tribute to the elders in their lives and encouraged students to value and care for older generations.



## Hridaya stars at Global Abacus & Mental Arithmetic Competition

PTV (ICSE) takes immense pride in celebrating the remarkable achievement of Hridaya Parekh of Grade IV A at the 14th PAMA Global Abacus & Mental Arithmetic National Competition organised by APPL. The competition witnessed the participation of over 3,500 students from across the country.

Hridaya showcased exceptional mental agility, speed and accuracy to secure the prestigious position of 2nd Runner-Up in the C2 Category. Competing against 550 students in her age group, she demonstrated outstanding focus, determination, and perseverance.





## Devashree and Veer dazzle at sporting meets

In the academic year 25-26, Devashree Bane (Std. VI) of PTVA's EMS, Andheri, secured 7th rank in the Divisional Artistic Gymnastics Competition in the Girls U14 category. She was awarded with a certificate by the Govt. of Maharashtra. Further, Veer Tiwari (Std. VII), also from PTVA's EMS, Andheri, stood third in the Spring Board Diving Competition at the District Level in the Boys U14 category. He received a certificate by the DSO sports officer.

**Mr Akshay Dighe, PE Teacher, PTVA's EMS, Andheri**

# Meet the Sanskrit Scholars of PTVA's EMS, Andheri




The students of PTVA's EMS, Andheri participated for the first time in the State Level Sanskrit Competition conducted by Ravikirti Sanskrit Adhyayan Kendra, Sangli, in association with Kavikulguru Kalidas Sanskrit Vishvavidyalaya, Ramtek. In the very first year of their participation, the students brought laurels to the school.

At the District Level, Kshitij Shinde (Std. VII) and Nidhi Khamkar (Std. VIII) secured First Rank (Gold Medal) and Third Rank (Bronze Medal) respectively.

Rama Mestry (Std. VI), Natasha Vengurlekar (Std. VII), Nivida Mondkar (Std. VIII), and Tejaswini Gurav (Std. IX) topped at the school level. Each of them secured a cash prize of ₹100 from the organisers.

The school extended heartiest congratulations to the Sanskrit scholars and their mentor - Sanskrit Teacher Mrs Swati Bapat.

**Mrs Swati Bapat, Asst Teacher, PTVA's EMS, Andheri**

## Shaurya, Swati, Vanshraj shine at Mumbai Mayor's Cup



Shaurya



Swati



Vanshraj

Students of PTVEMS (Secondary) dazzled at the Mumbai Mayor's Cup – Artistic & Rhythmic Gymnastics Competition 2026, held on 13 and 14 June at the Andheri Sports Complex.

Shaurya Lad (Std. VIII C) displayed exceptional skill and determination in Artistic Gymnastics and won Silver Medals in Pommel Horse and Vault

Swati Mohite (Std. VII D) delivered an outstanding performance and secured Silver Medals in Floor Exercise, Uneven Bars, and Overall Championship, and Bronze Medal in Balancing Beam

Vanshraj Jangam (Std. V A) demonstrated remarkable talent and perseverance, earning Silver Medal in High Bar Event.

These achievements are a testament to the students' hard work, discipline, dedication, and passion for gymnastics. Their success has brought immense pride to the school, their coaches, teachers, and families.



## Shining In Sri Lanka

Two students from PTV (ICSE) impressed at the International Sub Junior Open Karate Championship held in Sri Lanka.

Aahan Girap secured Gold Medals in Individual Kumite and Team Kata and Silver medal in Kata in the Boys Under 10 (-30kg) category. He was also honoured with the Best Fighter Moment Award.

Varnam Gada won Gold Medals in Individual Kumite and Team Kata and Silver Medal in Kata in the Boys Under 11 (-32 kg) category. He was also honoured with the Best Fighter Moment Award.

Aahan and Varnam displayed exceptional skill and determination, bringing immense pride to the school and the nation on an international platform under the training and guidance of International Karate Coaches Arvind Chavan and Vibhavali Chavan.

## Crack The Code

**Answer of April-May Challenge**



With **integrity** guiding our actions and **empathy** shaping our hearts, we learn to face challenges with **perseverance.** When we practise **generosity** and show **respect** to others, we grow into individuals who understand the importance of **responsibility.**









# PTV (ICSE) excels at GMMO 2026

A total of 168 students from Grades I to IX of PTV (ICSE) participated in the Mumbai Edition of the Global Mental Math Olympiad (GMMO) 2026, hosted by Live Math Competition and League at A.M. Naik School, L&T Campus, Powai.

**Top 25 – Standard Mandatory Challenge**

**Category: Master** - Shravani Kadam (Grade VI) and Aheli Anavkar (Grade VI) secured Rank 11 and 24, respectively.

**Category: Challenger** - Omkar Borker (Grade III), Tvish Nimma (Grade III), Viaan Patil (Grade IV), and Arnav Oke (Grade III) earned Rank 3, 6, 7, and 10, respectively.

**Top 10 – Addition & Subtraction Sprints Challenge**

**Category: Master** - Sharva Juvekar (Grade IV) secured Rank 7

**Category: Challenger** - Vihaan Shirodkar (Grade IV), Swojas Sane (Grade IV), and Vihan Patel (Grade IV) earned Rank 8, 9, and 10, respectively.

A noteworthy highlight is that 67 students qualified for the Grand Finale of the 5th Edition of the Online Mental Math World Cup 2026, reflecting their strong preparation, skill and dedication.

## RIDDLE TIME!

1. I am tiny and often unseen,
   Yet I help keep the planet green.
   I make much of the oxygen you breathe,
   Floating in oceans beneath.
   What am I?

2. Longer than any mountain chain on land,
   I stretch beneath oceans so grand.
   Most people never see my peaks,
   Yet about Earth's geology I speak.
   What am I?

3. I look like a rock but am actually alive,
   Thousands of species in me thrive.
   Warming seas can make me turn white,
   A warning that all is not right.
   What am I?

4. I am neither fish nor plant,
   Yet many creatures say I can't
   Be ignored, for I create a home
   Where countless ocean species roam.
   Though fragile, I build reefs so grand.
   What am I?

5. Before dinosaurs vanished from Earth,
   My ancestors had already begun their birth.
   Using Earth's magnetic field as a guide,
   Across oceans I still glide.
   Who am I?

6. Every few years I alter the rain,
   Bringing drought or floods again.
   Born from warming waters far away,
   Farmers watch for signs of my sway.
   What am I?

**Team PTV ICSE (Secondary)**

Answers: 1. Phytoplankton, 2. Mid-Ocean Ridge, 3. Coral, 4. Coral Polyp, 5. Sea Turtle, 6. El Niño

# My resolution for the New Academic Year...



We should always strive to grow and become better at our duties. The new academic year provides a perfect fresh beginning, filled with opportunities and challenges. It can offer us valuable experiences and achievements, but if we continue to remain the same and follow the same habits, we will not be able to grow. Therefore, we should make some academic resolutions to improve ourselves.

Resolutions are the key to self-improvement. They help us overcome bad habits and develop good ones. Though they help us tremendously, resolutions do not necessarily have to involve big changes. They can be small improvements in our habits, such as being punctual, completing our homework on time, paying attention in class and staying organised. Slowly and steadily, we should continue improving our habits to achieve the goals we strive for.

As we make small improvements, we should not lose sight of the bigger goals we are working towards. These goals can include improving our marks, strengthening our weaker subjects, participating more in extracurricular activities and developing new skills. Such goals encourage us to step out of our comfort zones and help us grow as individuals.


However, setting goals alone is not enough. It is important to work towards them consistently with determination and perseverance. Many students fail at this stage and, as a result, are unable to improve. We should remember that Rome was not built in a day. Therefore, we must not give up and should continue to follow our resolutions with dedication to achieve our dreams.

As Robert Collier rightly said, "Success is the sum of small efforts, repeated day in and day out." This reminds us that every small step we take towards our resolutions brings us closer to our goals.

In conclusion, the new academic year is the perfect opportunity for us, as students, to begin a new journey with a fresh mindset and work together towards our goals.

**- Arnav Jadhav (Std. X C), PTVEMS**

## Hidden Talent





**नुपूर अमित राणे ही पार्ले टिळक विद्यालय प्राथमिकची ४/१ मधील विद्यार्थिनी असून वयाच्या सातव्या वर्षापासून म्हणजेच २०२३ पासून तिने मल्लखांब खेळता खेळता "जय जवान गोविंदा पथकातून" प्रशिक्षक संदीप ढवळे यांच्या मार्गदर्शनाखाली दहीहंडीचा सराव सुरू केला. २०२३ मध्ये प्रथम दहा थर लावण्याचा प्रयत्न असफल झाला. मात्र वयाच्या नवव्या वर्षी २०२५ मध्ये दहा थर तीन वेळा लावून जागतिक विश्वविक्रम केला.**



**पार्ले टिळक विद्यालय प्राथमिकची ४/१ मधील विद्यार्थिनी आर्या घाडी हिने आपल्या सुमधुर गायनाने पार्लेकरांचे लक्ष वेधून घेतले आहे. आर्या अतिशय सुंदर आणि भावपूर्ण भजन गाते. संगीताचा हा वारसा केवळ स्वतःपुरता मर्यादित न ठेवता ती सामाजिक आणि कौटुंबिक पातळीवरही तो जोपासत आहे. दरवर्षी दसरा आणि दिवाळी यांसारख्या मोठ्या सणांच्या निमित्ताने आर्या तिच्या इमारतीमध्ये भजनांचा विशेष कार्यक्रम सादर करते. शालेय शिक्षणासोबतच आर्याने जोपासलेली ही सांगीतिक आणि सांस्कृतिक आवड कौतुकास्पद असून, तिच्या या सांगीतिक प्रवासाला पार्ले टिळक विद्यालय परिवाराकडून शुभेच्छा दिल्या जात आहेत.**

# उन्हाळी सुट्टी-अनुभवांची खाण



परीक्षा संपली की आम्हा सर्व विद्यार्थ्यांना वेध लागतात ते उन्हाळी सुट्टीचे. उन्हाळ्याची सुट्टी म्हणजे रोज सकाळी लवकर उठण्याची घाई नाही, अभ्यासाचे ओझे नाही, यंदाची उन्हाळी सुट्टी माझ्यासाठी खूप आनंददायी, ज्ञानवर्धक आणि अविस्मरणीय ठरली.

या सुट्टीत मी माझ्या कुटुंबासोबत माझ्या आजोळच्या गावी गेले होते. उंच डोंगर आणि सुंदर निसर्ग पाहून माझे मन प्रसन्न झाले. गावाकडचे जीवन शहरापेक्षा खूप वेगळे असते. तिथे सकाळी पक्षांच्या आवाजाने जाग येणे, मामाच्या मुलांसोबत विहिरीवर पोहायला जाणे आणि झाडावर चढून आंबे तोडून खाणे यात एक वेगळीच मजा आली. रात्री अंगणात चटई टाकून, चांदण्यांकडे पाहत आजीकडून गोष्टी ऐकताना वेळ कसा निघून जात असे ते कळलेच नाही. मी सुट्टीत काही गोष्टींची पुस्तकेही वाचली. मला चित्रांची आवड, त्यामुळे दुपारच्या वेळी मी जलरंग वापरून सुंदर निसर्ग चित्रे काढली. तसेच टाकाऊ वस्तूंपासून काही शोभेच्या वस्तू तयार केल्या. या सुट्टीत मी केवळ गावालाच नाही, तर मी माझ्या कुटुंबासोबत गुजरातमधील स्टॅच्यू ऑफ युनिटीला फिरायला गेले होते. हे ठिकाण नर्मदा नदीच्या काठावर वसलेले असून अतिशय सुंदर आणि आकर्षक आहे. स्टॅच्यू ऑफ युनिटी हा जगातील सर्वात उंच पुतळा आहे. त्याची उंची 182 मीटर (597 फूट) आहे. स्टॅच्यू ऑफ युनिटी हा भारताचे महान स्वातंत्र्यसैनिक आणि पहिले गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांच्या स्मरणार्थ उभारण्यात आला आहे. तेथे आम्ही संग्रहालय, फुलांची बाग आणि इतर पर्यटन स्थळांना भेटी दिल्या.

या सहलीत मला खूप नवीन गोष्टी शिकायला मिळाल्या. ही सहल माझ्यासाठी अविस्मरणीय ठरली आणि मी त्या आठवणी नेहमी जपून ठेवीन. या सुट्टीत मी केवळ स्वतःचा आनंद पाहिला नाही, तर आईला घरकामात मदत केली. या सुट्टीने मला निसर्गाच्या जवळ नेले, छंद जोपासायला शिकवले आणि कुटुंबासोबत आनंद साजरा करण्याची संधी दिली. मोबाईल आणि टीव्हीच्या आभासी दुनियेपेक्षा प्रत्यक्ष निसर्गात आणि माणसांमध्ये राहण्याचा आनंद किती मोठा असतो, हे मला या सुट्टीत अनुभवायला मिळाले. आता मी अत्यंत उत्साहाने आणि नवीन उर्जेने माझ्या नवीन शैक्षणिक वर्षाचे स्वागत करण्यासाठी तयार आहे.

**वेदिका गोताड ९/४**
**पार्ले टिळक विद्यालय**
**मराठी माध्यमिक शाळा**



# A New Chapter Begins At PTV (ICSE)!

**(From Pg.1)**

The programme proceeded with the school's daily prayer, followed by the rendition of the National Anthem and the State song, fostering a spirit of unity, patriotism, and pride among all present. The Principal delivered an inspiring address, expressing heartfelt gratitude to the Management, teachers and ancillary staff, whose relentless efforts and dedication made the relocation to the new building possible. Subsequently, group photographs were taken to commemorate the auspicious occasion. As the students made their way towards their respective classrooms, they were warmly greeted with a traditional tilak, signifying an auspicious beginning in the new premises. Each class assembled outside their classrooms, where a ribbon-cutting ceremony was conducted with great excitement. The students then entered their new classrooms with immense joy and anticipation, marking the beginning of a promising new chapter in the institution's journey. The function concluded on a jubilant and memorable note, leaving everyone inspired, elated, and proud to be a part of this significant milestone.




At PTV ICSE (Primary), the occasion was made special with beautifully decorated classrooms and a warm welcome by the teachers. Adding to the excitement, students participated in a unique ribbon-cutting ceremony at the entrance of their classrooms, symbolically inaugurating their new learning spaces. To commemorate this historic moment, students took part in the 'Leaving Our Mark' activity. Each child placed a colourful thumbprint on a beautifully designed tree where their name was mentioned, creating a vibrant 'Tree of Belonging.' The artwork symbolised growth and the shared journey that lies ahead for the first batch of students in the new campus. The activity served as a meaningful reminder that while the building is new, it is the students who bring it to life with their dreams, talents and aspirations. It was a joyful beginning to a new chapter in the school's journey.

# Let's Be a Better Version Of Ourselves

Today, I want you to imagine something. Imagine that exactly one year from today, on the last day of this academic year, you receive a letter. Not from your parents...Not from your teachers...Not from your friends... But from your future self. The person you will become one year from today.
Now imagine opening that letter...
What would it say?
Would it say:
"Thank you for working hard when you didn't feel like it."
"Thank you for being kind to others."
"Thank you for listening to your parents and teachers."
"Thank you for believing in yourself when things became difficult."
Or, would it say:
"Why did you waste so much time?"
"Why did you give up so easily?"
"Why did you wait for tomorrow instead of starting today?"
Dear students,
The beautiful thing is that...
That letter has not been written yet.
You will write it....
Every day, with your choices.
Every time you tell the truth... you write a line.
Every time you help someone... you write a line.
Every time you study sincerely... you write a line.
Every time you show courage instead of fear... you write a line.
You are writing that letter....... every single day.
Now let me tell you a secret.
Success is not built in one day.
A tree does not become tall overnight.
A cricketer does not score a century with a single shot.
A student does not become successful because of one examination.
Success is built... through small actions repeated every day.
A little reading...
A little discipline...
A little kindness...
A little improvement........... every single day.
So, this year, do not make ten resolutions.
Instead, make only one.
"Every day, I will become a little better than I was yesterday."
Not better than your friend.
Not better than the class topper.
But, better than yourself.
Because life is not a competition with others.
It is a journey of becoming the best version of yourself.



And remember something very important:
Years from now, people may forget your marks.
They may forget your rank.
But they will never forget your character.
They will remember your honesty...
Your kindness...
Your courage...
And the way you treated others.
So, as this new academic year begins, let us make a silent promise to ourselves:
I will choose... effort over excuses.
I will choose... kindness over cruelty.
I will choose... courage over fear.
I will choose... growth over comfort.
And every day I will try to become a better human being.
And now, as we stand at the beginning of a year full of possibilities,
Think about one habit... you want to leave behind.
Think about one quality... you want to develop.
Think about one dream... you want to move closer to.
Because one year from today, when that letter finally arrives,
I hope it says only these words:
"Dear Me,
Thank you for becoming the person I was meant to be.
The page is blank...
The pen is in your hands.
Let us begin writing a beautiful year together.
"The person you dream of becoming is not waiting for tomorrow..."
"They are born through the choices you make today."
So, choose wisely.
Choose courage.
Choose kindness.
Choose growth.
And let your future self be proud of the
story you begin writing today.

**-Mr Rajendra Sanga,**
**Teacher, PTVEMS (Secondary)**

# 'शिक्षक' ही केवळ नोकरी नसून तो एक 'अखंड विद्यार्थी'

**Teacher as a student**

शिक्षणाची न संपणारी ज्ञानपंढरी म्हणजे केवळ पदव्यांची टांगलेली पाटी किंवा भिंतीवरची प्रमाणपत्रे नव्हेत, तर ती स्वतःला सतत प्रगल्भ करण्याची एक निरंतर प्रक्रिया आहे. आपण जेव्हा 'शिक्षक' म्हणून वर्गात उभे राहतो, तेव्हा आपल्या पाठीशी एका 'विद्यार्थ्या'चा मोठा इतिहास असतो. हा इतिहास कधी यशाने रसरसलेला असतो, तर कधी अज्ञानाच्या चटक्यातून पेटलेला असतो. माझ्या आयुष्यातला असाच एक प्रसंग, ज्याने मला माझ्या वाचनाच्या अथांग महासागराची ओळख करून दिली. तो एक प्रसंग जो विसरता येत नाही.



मी साधारण चौथी-पाचवीत असेन. त्या वयात आपल्याला वाटत असतं की आपल्याला सगळं येतं. एकदा आमच्या शाळेत काही मान्यवर पाहुणे आले होते. संपूर्ण वर्गात उत्साहाचं वातावरण होतं. बोलता-बोलता एका पाहुण्यांनी सहज प्रश्न विचारला, "मुलांनो, आपल्या स्वतंत्र भारताचे पहिले राष्ट्रपती कोण?" मला वाटलं मला उत्तर येतंय. मी मोठ्या उत्साहाने आणि आत्मविश्वासाने हात वर केला. पाहुण्यांनी माझ्याकडे आशेने पाहिलं, पण मी जेव्हा चुकीचं नाव सांगितलं, तेव्हा संपूर्ण वर्गात हशा पिकला. मित्रांच्या त्या हसण्यापेक्षा मला बाईंच्या नजरेतील ती टोचणारी निराशा जास्त अस्वस्थ करून गेली. बाईंनी माझ्याकडे रागाने आणि निराशेने पाहिलं आणि म्हणाल्या, "अरे, इतकी साधी आणि महत्त्वाची गोष्ट तुला माहित नाही? तू अवांतर काही वाचतोस की नाही, की फक्त पाठ्यपुस्तकातले धडे पाठ करतोस?"

तो टोचलेला प्रश्न आणि बाईंचे ते शब्द एखाद्या तीरासारखे माझ्या मनाला टोचले. मला वाटायचं की परीक्षेत चांगले गुण मिळवणं आणि फक्त पाठ्यपुस्तकातलं वाचलं की आपण 'हुशार' होतो. पण त्या दिवशी मला समजलं की, खऱ्या ज्ञानाचं जग हे शाळेच्या पुस्तकाबाहेर आहे. त्या रात्री मला झोप लागली नाही. माझं अज्ञान मला आतून खात होतं. शाळेतील सर्व मुले मला हुशार समजायची, पण एका साध्या प्रश्नाने माझी हुशारी किती पोकळ आहे, हे मला दाखवून दिलं होतं. तो अपमान नव्हता, तर माझ्या डोळ्यांत घातलेले ज्ञानाचे अंजन होते. दुसऱ्या दिवसापासून मी शाळेच्या ग्रंथालयाचा रस्ता धरला. सुरुवातीला तिथली शांतता मला भीतीदायक वाटली, पण हळूहळू पुस्तकांशी मैत्री झाली. सुरुवातीला मी गोष्टींची, परीकथांची पुस्तके वाचली. त्यानंतर वर्तमानपत्रातील बातम्या, साप्ताहिके, मासिके आणि थोर पुरुषांची चरित्रे वाचू लागलो. जे अज्ञान त्या दिवशी मला बोचलं होतं, तेच आता माझ्या ज्ञानाची भूक बनलं होतं. मी रोज एक तरी नवीन गोष्ट शिकायचा नियमच केला. ज्या मुलाला 'सामान्य ज्ञान' म्हणजे जनरल नॉलेज काय हे माहीत नव्हतं, तो मुलगा आता शाळेच्या 'प्रश्नमंजुषा' स्पर्धेत आपल्या वर्गाचं नेतृत्व करू लागला होता. वाचनाने मला शब्दांची साथ दिली आणि विचारांना नवी दिशा दिली.

आज मी स्वतः शिक्षक म्हणून वर्गात उभा राहतो, तेव्हा मला माझ्या त्या बालपणीच्या चुकांची आठवण येते. मी माझ्या विद्यार्थ्यांना फक्त पुस्तकातलं शिकवत नाही, तर त्यांना सांगतो की, "बाळांनो, पुस्तकाच्या दोन कव्हरमध्ये जे ज्ञान आहे, ते केवळ परीक्षेसाठी आहे. पण जीवनाच्या परीक्षेत पास व्हायचं असेल, तर जगाचं पुस्तक वाचायला शिका." जर त्या दिवशी माझा तो अपमान झाला नसता, तर कदाचित मी आज फक्त एक 'अभ्यासू' पदवीधर असतो, पण 'वाचक' नसतो. वाचनाने मला संवेदनशील बनवलं, मला जगाशी जोडलं. मी आजही रोज सकाळी वर्तमानपत्र वाचताना किंवा एखादं नवीन पुस्तक हातात घेताना त्याच लहान मुलाच्या भूमिकेत असतो, ज्याला जगाबद्दल अजून खूप काही जाणून घ्यायचं आहे. 'शिक्षक' ही केवळ एक नोकरी नसून तो एक 'अखंड विद्यार्थी' राहण्याचा प्रवास आहे. जोपर्यंत आपल्या मनात नवीन काहीतरी शिकण्याची ओढ जिवंत आहे, तोपर्यंतच आपण आपल्या विद्यार्थ्यांना खऱ्या अर्थाने काहीतरी देऊ शकतो.

**श्री. जी. एस. सुळे**
**(Ass. Teacher)**
**पार्ले टिळक विद्यालय मराठी प्राथमिक शाळा**

## मॅजिक मिल्क (Magic Milk) प्रयोग (विद्यार्थ्यांसाठी सोपा विज्ञान प्रयोग)






**उद्दिष्ट:** साबणामुळे दूधातील चरबीवर काय परिणाम होतो हे समजून घेणे.

**साहित्य:** १ वाटी पूर्ण फॅटचे दूध, विविध रंगांचे फूड कलर, लिक्विड डिशवॉश साबण, कॉटन बड (Ear Bud)

**कृती:** एका सपाट ताटलीत किंवा वाटीत दूध घ्या. दुधात वेगवेगळ्या ठिकाणी फूड कलरचे २-३ थेंब टाका. कॉटन बडला थोडासा डिश वॉश साबण लावा. साबण लावलेला कॉटन बड दुधाच्या मध्यभागी हलकेच स्पर्श करा. रंग वेगाने पसरून सुंदर आकृत्या तयार होताना निरीक्षण करा.

**निरीक्षण :** साबणाचा स्पर्श होताच रंग सर्व दिशांनी पसरतात आणि दुधात आकर्षक नमुने तयार होतात.

**वैज्ञानिक कारण :** दुधात पाणी, चरबी आणि प्रथिने असतात. साबण चरबीचे रेणू तोडण्याचे काम करतो. त्यामुळे दुधातील रेणूंची हालचाल वाढते आणि त्यासोबत फूड कलरही वेगाने फिरू लागतो.

**निष्कर्ष:** साबण दुधातील चरबीशी अभिक्रिया करतो, त्यामुळे रंगांची हालचाल होते. हा प्रयोग पृष्ठतनाव (Surface Tension) आणि चरबीवर साबणाचा परिणाम समजावून सांगतो.

हा प्रयोग इयत्ता पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांसाठी विज्ञान प्रदर्शन, शालेय परिपाठ किंवा वर्गातील प्रात्यक्षिकासाठी अतिशय उपयुक्त आहे.

## Crack The Code Challenge

Our institution has always been a beacon of 1)__________ and 2)__________, inspiring students to strive for success and personal growth. It fosters the pursuit of 3)__________ while emphasising the importance of 4) __________ in everyday life. With a strong commitment to 5)_____________, the school provides a nurturing environment where young minds can develop their talents and realise their full potential. The 6) __________ of the institution reflects the values and vision that continue to guide it towards a bright future.

Editor : Mrs Janhavi Khandekar | Supported by Thanevaibhav and KYT Team